



# पार्श्वभूमी


किरायाने देणे आहे
मोंढा रोड, जिजामाता चौक येथे
1500+ Sq.Ft.चा गाळा योग्य दरात किरायाने देणे आहे. पॉलीक्लिनिक, हॉस्पिटल, बँक, ऑफिस, शोरूम इत्यादीसाठी देणे आहे.
संपर्क :9834888681



बीड वर्ष ३६ वे अंक ९९ वा फोन २३०१०१ दिनांक ९ मार्च २०२६ सोमवार | गंमत भंडारी | ई-पेपर : www.parshvbhumi.com | Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 | पाने ६ किंमत ४रु.


## विद्यार्थी आठवडाभर मोबाइलविना

### पुण्यातील शिक्षण संस्थेचा अभिनव निवासी अभ्यासक्रम

पुणे दि.८ (प्रतिनिधी):– सध्याच्या स्पर्धेच्या, धावपळीच्या, मोबाइलच्या युगात विद्यार्थ्यांना पुन्हा मातीशी जोडण्यासाठी एमआयटी शिक्षण संस्थेतर्फे अभिनव प्रयोग करण्यात आला आहे. दौंडनजीक बोरीबेल येथे जीवन परिवर्तन केंद्र (लाइफ ट्रान्सफॉर्मेशन सेंटर) उभारण्यात आले असून, विद्यार्थ्यांच्या शारीरिक, बौद्धिक, मानसिक आरोग्याची जोपासना, जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन विकसित करण्यासाठी सात दिवसांचा निवासी अभ्यासक्रम या केंद्राच्या माध्यमातून राबवला जाणार आहे.



केंद्राचे संचालक प्रा.राहुल कराड यांनी पत्रकार परिषदेत याबाबतची माहिती दिली. एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रविकुमार चिटणीस, डॉ. श्रुती निगुडकर, डॉ. दत्ता दंडगे या वेळी उपस्थित होते. केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान, आध्यात्मिक गुरू रामदेव बाबा, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, लष्कराच्या दक्षिण मुख्यालयाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल धीरज सेठ, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. विश्वनाथ कराड यांच्या उपस्थितीत केंद्राचे उद्‌घाटन १२ मार्च रोजी करण्यात येणार आहे. १५० एकरपेक्षा अधिक कार्यक्षेत्रामध्ये या केंद्राची उभारणी करण्यात आली आहे. प्रा.कराड म्हणाले, आताच्या काळात शिक्षणाला जीवनमूल्ये, दृष्टिकोनाची जोड देण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी जीवन परिवर्तन केंद्राची उभारणी करण्यात आली आहे. शेती आणि निसर्ग, शारीरिक स्वास्थ्य आणि खेळ, संघनिर्माण आणि नेतृत्व, देशभक्ती आणि राष्ट्रनिर्माण, अध्यात्म आणि शांती या घटकांचा विचार त्यामागे आहे. उच्च शिक्षणातील हा अत्यंत वेगळा प्रयोग पान २ वर

**दोन सकारात्मक बातम्या**

## आई-बहिणीवरून जो शिवी देईल, त्याला कडक शासन होईल!

### अहिल्यानगर जिल्ह्यातील गावाने घेतला निर्णय




कर्जत दि.८ (वृत्तसेवा):– शब्द कधी जखम करतात, तर कधी समाज घडवतात. महिलांच्या सन्मानाला धक्का देणाऱ्या शिव्यांना पूर्णविराम देण्यासाठी कोळगावच्या (श्रीगोंदे, अहिल्यानगर) महिलांनी महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर एक आगळावेगळा निर्णय घेतला. गावात कोणीही आई-बहिणींवरून शिवी दिल्यास ५०० रुपये दंडाची कारवाई करण्याचा ठराव करत महिलांनी सन्मान, स्वच्छता आणि संस्कार यांचा नवा संदेश दिला.

जागतिक महिला दिनाच्या निमित्त मौजे कोळगाव (ता. श्रीगोंदा, अहिल्यानगर) येथे ग्रामपंचायतीने आज, रविवारी विशेष महिला ग्रामसभेचे आयोजन केले होते. ग्रामसभेच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ अंगणवाडीसेविका शकुंतला देशमुख होत्या. अध्यक्षपदाची सूचना अंगणवाडी सेविका विद्या लगड यांनी मांडली, अनुमोदन मीना भापकर यांनी दिले. ग्रामसभेची विषयपत्रिका ग्रामपंचायत अधिकारी एस. एस. कवडे यांनी वाचून दाखविली.

ग्रामसभेत गावातील शेतीसह विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला. त्यानंतर महिलांनी गावाच्या सामाजिक वातावरणाबाबत गंभीर चर्चा करत एक महत्त्वाचा पान २ वर

## भारत तिसऱ्यांदा टी-२० वर्ल्ड चॅम्पियन

### होळीनंतर टीम इंडियाची दिवाळी

### न्यूझीलंडचा ९६ धावांनी पराभव



अहमदाबाद दि.८ (वृत्तसेवा):- भारताने न्यूझीलंडला हरवून तिसऱ्यांदा टी-२० विश्वचषक जिंकला. सलग दोनदा टी-२० विश्वचषक जिंकणारा भारत हा पहिला संघ ठरला. यजमान संघाने टी-२० विश्वचषक जिंकण्याची ही पहिलीच वेळ आहे. दरम्यान होळी नंतर टीम इंडियाने न्यूझीलंडला हरवत विजयाची दिवाळी साजरी केली.

रविवारी अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या सामन्यात न्यूझीलंडने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला. टी-२० विश्वचषक फायनलमध्ये भारताने प्रथम फलंदाजी करताना विक्रमी २५५ धावा केल्या. संजू सॅमसनने ८९ धावा केल्या, जी टी-२० विश्वचषक फायनलमधील सर्वोच्च धावसंख्या आहे. ईशान किशनने ५४ आणि अभिषेक शर्मानि ५२ धावा केल्या. अखेर शिवम दुबेने ८ चेंडूत २६ धावा केल्या. न्यूझीलंडकडून जिमी नीशमने तीन विकेट घेतल्या.

लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या न्यूझीलंडची सुरुवात खराब झाली. सेफर्ट (५२) आणि कर्णधार सँटनर (४३) वगळता इतर कोणताही फलंदाज भारतीय गोलंदाजांसमोर टिकू शकला नाही. संपूर्ण संघ १९ षटकांत १५९ धावांवर बाद झाला. धावांच्या बाबतीत न्यूझीलंडला पान २ वर

## घरगुती गॅस सिलिंडरचे दर ६० रुपयांनी वाढले

मुंबई दि.८ (प्रतिनिधी):- घरगुती गॅस सिलिंडरच्या किंमती ६० रुपयांनी वाढल्या आहेत. येत्या काळात इंधन तुटवडा निर्माण होईल अशी स्थिती येऊ शकते असं काही माध्यमांनी म्हटलं आहे.



याबाबत विचारलं असता देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्टीकरण दिलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं की, लोकांमध्ये चुकीची माहिती देऊन माध्यमांनी पॅनिक तयार करू नये, भारत सरकारने अतिशय स्पष्टपणे या संदर्भातली भूमिका मांडली आहे. भारताच्या एनर्जी सिक्युरिटीच्या संदर्भात कशाप्रकारे मोदीजींनी पाऊल उचलली आहेत हे आपल्यासमोर आलेलं आहे असं मुख्यमंत्री म्हणाले आहेत. पान २ वर

## अमर नाईकवाडेंच्या पाठपुराव्यामुळे खंडेश्वरीतील कचरा हटविण्याची मोहिम

बीड दि.८ (प्रतिनिधी):– येथील प्रभाग क्रमांक ३ चे नगर सेवक अमर नाईकवाडे यांनी त्यांच्या प्रभागातील खंडेश्वरी मंदिर ते खंडोबा मंदिरकडे जाणाऱ्या रस्त्यावर आणून टाकलेला कचरा तात्काळ उचलावा अशी मागणी २६ फेब्रुवारी रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत केली होती. त्यानंतर मुख्याधिकारी आणि अमर नाईकवाडे यांनी संयुक्तरित्या खंडेश्वरी मंदिराच्या परिसरात जाऊन परिस्थितीची पाहणी केली होती. मुख्याधिकाऱ्यांनी या प्रकरणी लक्ष घातल्याने या परिसरातील कचरा उचलून डम्पींग ग्राऊंडला नेण्यास सुरुवात करण्यात आलेली आहे.



नगर पालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये नगर सेवक अमर नाईकवाडे यांनी प्रश्न उपस्थित केला होता की त्यांच्या प्रभाग क्रमांक ३ मध्ये खंडेश्वरी माता मंदिर येथे भाविक भक्तांचे हे श्रद्धास्थान आहे. या मंदिर परिसरात दररोज सकाळी नागरिक मॉर्निंग वॉकसाठी येतात, मात्र खंडेश्वरीच्या दीपमाळेकडे जाणाऱ्या रस्त्यावर नगर पालिका गावातील कचरा आणून टाकत आहे, त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून पान २ वर

## केंद्रप्रमुख पदोन्नती प्रक्रियेविरुद्ध संताप

### जिल्हा परिषदेने अखेर शिक्षकांवर उपोषणाची वेळ आणली


बीड दि.८ (प्रतिनिधी):- जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाने केंद्रप्रमुख पदोन्नतीची प्रक्रिया राबविण्याचा घाट घातला आहे. केवळ एक-दोन जणांच्या फायद्यासाठी सर्व नियम डावलून आणि प्रकरण न्यायप्रविष्ट असतांनाही केंद्रप्रमुख पदोन्नतीचा हट्ट धरला जात आहे. सीटीईटी परिक्षेचा निकाल लागण्यापुर्वीच ही प्रक्रिया पूर्ण करण्याच्या प्रयत्नाविरुद्ध सर्व स्तरातून संताप व्यक्त होऊ लागला आहे. त्यामुळेच आज जिल्हा परिषदेने शिक्षकांवर उपोषणाची वेळ आणल्याचे दिसून येत आहे. आज दि.९ मार्च पासून बीड जिल्हा परिषदेसमोर विविध शिक्षक संघटनांच्या नेतृत्वाखाली सर्व शिक्षक एकत्र येत बेमुदत उपोषण करणार आहेत.

सीटीईटी परिक्षेचा निकाल लागेपर्यंत केंद्रप्रमुख पदोन्नती प्रक्रिया राबविण्यात येऊ नये, टीईटी परिक्षे संदर्भात सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयास अनुसरुन देशातील अनेक राज्य शासनांनी आणि देशातील अनेक शिक्षक संघटनांनी ४० ते ५० रिव्ह्यूव पिटीशीन दाखल केलेल्या आहेत, पान २ वर

### जिल्ह्यात सर्वत्र जल्लोष

बीड दि.७ (प्रतिनिधी):- भारताने न्यूझीलंड विरुद्ध झालेल्या अंतीम सामन्यात ट्वेन्टी २० वर्ल्डकप जिंकल्यानंतर जिल्ह्यात सर्वत्र जल्लोष साजरा करण्यात आला. फटाक्यांची आतिषबाजीने आकाश दिपून गेले होते.


पाहिजेत
रुम सर्व्हिससाठी व साफसफाईसाठी 2 मुले पाहिजेत
गरजुंनी संपर्क करावा. वेळ:दु.12 ते 4.00
हॉटेल साई पॅलेस
जालना रोड, बीड.
P.P.







HYUNDAI

Scan to chat with us or give a missed call at 5555295868 | my Hyundai app | Hyundai Click to Buy | 3 Year Unlimited* Kilometer Warranty | 3 Year Road Side Assistance (RSA)* | Upto 7 Years Extended Warranty* | Upto 5 Years Shield of Trust Running Repair Package* | Upto 5 Years Shield of Trust Super Maintenance Package*

दीप ह्युंडई | बीड: जालना रोड, आनंदवाडी, बीड. अंबेजोगाई: तथागट चौक, एच. पी. पेट्रोल पंप समोर, अंबेजोगाई. संपर्क: 9112824445

*Terms & conditions apply. This advertisement and car shown here is for creative representation purposes only and the depictions are for illustrative purposes. Features and specifications shown may or may not be part of standard fitment and are subject to change without prior notice. Hyundai Motor India Limited reserves the right to change specifications, colour, equipment and schemes at any time without prior notice. The black shade on glass are due to lighting effect. Size and colour may appear to vary due to lighting and position effect. Visit your nearest Hyundai dealership for more details.

आण, बाण, शाण
दिलदार व्यक्तिमत्व
बाळुसेठ मुंदडा
(मन्यारवाडीकर)




आमचे मित्र यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक ::
संपतराव रंगनाथराव गुंदेकर
माजी सरपंच आंबेसावळी तथा
मा.संचालक गजानन सहकारी सुतगिरणी ईट

हल्ली बहुतेक सगळ्यांनाच ताणतणाव असतात. असा माणूस शोधूनही सापडणार नाही ज्याला काहीच तणाव नाही. तणाव मानसिक आणि शारीरिक स्वरूपाचा असतो. कधीकधी क्षुल्लक वाटणारा एखादा प्रसंगही व्यक्तीमध्ये तणाव निर्माण करतो. तणावामुळे माणसाच्या मनावर आणि शरीरावर वाईट परिणाम होऊ शकतो. तणावग्रस्त व्यक्तीच्या जीवनात निरूत्साह, उदासीनता येते त्यामुळे अशी व्यक्ती योग्य निर्णय घेऊ शकत नाही.

# तणावात जगण्यापेक्षा हसत जगा

परीक्षेच्या काळात जवळ जवळ बहुतांश विद्यार्थ्यांना परीक्षेचा ताण येतो, याची वेगवेगळी कारणे असू शकतात. अगदी परीक्षेची तयारी पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनाही कमी-जास्त प्रमाणात ताण येतोच. परीक्षेच्या वेळी तणाव येऊ नये, यासाठी विद्यार्थ्यांनी अभ्यासाचे नीट नियोजन करणे गरजेचे आहे.
परीक्षा फक्त शाळा-कॉलेजच्या विद्यार्थ्यांपुरतीच मर्यादित नसते. इंटरव्ह्यू असो, स्पर्धा परीक्षा असो, प्रेझेंटेशन असो, अशावेळी सुद्धा थोड्याफार प्रमाणात ताण येतोच. त्यांना आपण आपली जबाबदारी व्यवस्थित पार पाडू शकू की नाही याची धास्ती वाटते. इतरांच्या आपल्याकडून असलेल्या अपेक्षा आपण पूर्ण करू शकलो नाही, तर काय होईल याचा ताण त्यांना येतो. काही विद्यार्थी आपली तुलना दुसऱ्यांशी करतात. तो अमुक किती हुशार आहे. आपण त्याच्यापुढे काहीच नाही, असा विचार करून बऱ्याच विद्यार्थ्यांना तणाव येतो. आपल्याला परीक्षेत आठवेल की नाही, जो अभ्यास केला तोच येईल की नाही असा विचार करून काही विद्यार्थी आपली तब्येत बिघडवून घेतात. अशावेळी थोडं मनाला शांत करून एक दीर्घ श्वास घ्यावा त्यामुळे आलेला ताण थोडा हलका होण्यास नक्कीच मदत होते. परीक्षेत आपणही इतरांपेक्षा चांगलं करून दाखवू शकतो याची खात्री बाळगावी. जो अभ्यास केला तो जरी नीट लक्षात ठेवला तरी आपल्यातील आत्मविश्वास वाढतो. अर्थात त्यासाठी नियमित अभ्यास गरजेचा आहे.
आजचे युग स्पर्धेचे आहे. इथे कुणीही ताणतणावापासून मुक्त नाही. जीवनातील ध्येय प्राप्त करायचे असेल, तर जीवनात थोडा ताण असणेही गरजेचे आहे. त्याशिवाय आपण मेहनत कशी करणार? प्रत्येकाची तणावाची कारणे वेगवेगळी असतात. नकारात्मक विचारांना बाजूला सारून आपले ध्येय गाठण्यासाठी सकारात्मक विचार करणे आवश्यक आहे. त्यासाठी मनाला रोज सांगायचे की मी हे काम करू शकतो किंवा शकते. म्हणजे तणाव येणं कमी होईल. भविष्याचा विचार करणाऱ्या लोकांना जास्त ताण येतो. जे होणार आहे ते आपल्या हातात नाही. म्हणूनच जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहावे आणि जीवनाचा मनमुराद आनंद घ्यावा. हसण्यानेही कितीतरी ताण कमी होतो. ताण कमी करण्यासाठी आपण आपल्या आवडत्या सिरीयल्स पाहू शकतो, आवडत्या लेखकाची पुस्तके वाचणे, छंद जोपासणे, नाटक, सिनेमा पाहू शकतो. यामुळे नक्कीच ताण कमी होईल. तणाव एक नैसर्गिक भावना आहे. मनात भीती निर्माण झाली की तणाव येतो. यातून बाहेर पडण्यासाठी आपण योग्य मार्गदर्शन मिळवू शकतो.

# चित्ताची एकाग्रता



आजच्या तंत्रज्ञानप्रधान धावपळीच्या युगात माणसाचे चित्त खूपच आस्थर झाले आहे. विचारांची गोंधळलेली गर्दी, सततचे विचलन, डिजिटल माध्यमांचे आकर्षण यामुळे चित्ताची एकाग्रता हरवलेली दिसते. पण जीवनात यश, समाधान आणि आत्मविकासासाठी चित्ताची एकाग्रता अत्यंत आवश्यक आहे.

चित्ताची एकाग्रता म्हणजे मनाच्या विचारधारेचं एका गोष्टीवर किंवा उद्दिष्टावर लक्ष केंद्रित करणं. यामध्ये बाह्य विचलनांपासून स्वतःला सावरून, अंतर्मनातून एका विचारात पूर्णपणे तल्लीन होणं अपेक्षित असतं.
एकाग्रतेचे महत्त्व करणे आवश्यक आहे. अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एकाग्रता ही शस्त्रासारखी असते. साधना करणाऱ्या साधकासाठी ती अध्यात्मिक उन्नतीचा मार्ग असते.
व्यावसायिकांसाठी एकाग्रता म्हणजे निर्णयक्षमता आण परिणामकारकता वाढवणारा मूलभूत गुण असतो. कोणत्याही कलाक्षेत्रात, खेळात किंवा विज्ञानात यश मिळवण्यासाठीही एकाग्रता अत्यावश्यक आहे. सतत बदलणारे सोशल मीडियाचे अपडेट्स, माहितीचा अतिरेक, असंतुलित आहार आणि झोप, मानसिक ताण, उद्दिष्टाचा अभाव या गोष्टी माणसाच्या चित्ताला विचलित करतात आणि त्याचा परिणाम एकाग्रतेवर होतो. या सर्व गोष्टी मनाला अस्थिर करतात.
चित्ताची एकाग्रता वाढवण्यासाठी उपाय :
ध्यान आणि श्वसन : दररोज काही मिनिटे ध्यान आणि श्वासावर लक्ष केंद्रित केल्याने मन शांत होते.
निश्चित दिनचर्या : नियमित वेळेवर झोप, उठणं आणि काम केल्याने मनाला स्थैर्य लाभतं.
डिजिटल डिटॉक्स : मोबाइल, टीव्ही आणि इंटरनेटचा मर्यादित वापर करणे.
स्वतःचे उद्दिष्ट निश्चित करणं : जेव्हा आपल्याला ठाम माहिती असतं की आपल्याला काय करायचं आहे, तेव्हा मन अधिक एकाग्र राहतं.
वाचन आणि लेखन : सतत चांगलं वाचन आणि स्वतःचं मन मांडणं हे मनाला एकत्र करायला मदत करतं.
योगासने आणि व्यायाम : शारीरिक स्वास्थ्यामुळे मानसिक एकाग्रता वाढते.
चित्ताची एकाग्रता ही साध्य होते, पण ती अचानक घडत नाही. सातत्य, संयम आणि आत्मनिरीक्षणाच्या सहाय्याने ती विकसित करता येते. जीवनातील कोणत्याही क्षेत्रात यशस्वी व्हायचं असेल, तर सर्वप्रथम चित्ताला एकाग्र करावं लागेल. शांतचित्त, एकाग्र मन आणि स्पष्ट दिशा यांमुळेच माणूस आत्मसाक्षात्कारी आणि समाधानी होतो.

# धूम्रपानामुळे वाढतो पोटाच्या कर्करोगाचा धोका

**पोटाचा** कर्करोग ज्याला गॅस्ट्रिक कॅन्सरदेखील म्हणतात. पोटाच्या अस्तरात असामान्य पेशी अनियंत्रितपणे वाढतात तेव्हा हा कर्करोग विकसित होतो. अनुवंशिकता आणि आहाराबरोबरच धूम्रपान हा एक जोखीम घटक ठरते.



दरवर्षी, पोटाच्या कर्करोगाची अनेक प्रकरणे दीर्घकालीन तंबाखूच्या सेवनाशी संबंधीत आहे. हे ज्ञात सत्य आहे की तंबाखूच्या धुरात हानिकारक रसायने असतात जी पोटाच्या आतड्यांना नुकसान पोहोचवू शकतात. तंबाखूमधील निकोटिन, टार आणि इतर रासायनिक घटक शरीरात प्रवेश करून पोटाच्या आतील आवरणावर (गॅस्ट्रिक म्यूकोसा) परिणाम करतात. या विषारी पदार्थांमुळे पोटातील पेशींच्या वाढीचा आणि पुनर्निर्मितीचा नैसर्गिक क्रम बिघडतो, ज्यामुळे कालांतराने कर्करोगजन्य बदल होऊ शकतात.
धूम्रपान करणाऱ्यांना हेलिकोबॅक्टर पायलोरी संसर्ग होण्याची शक्यता अधिक असते, जो पोटाचा अल्सर आणि कर्करोगाशी संबंधित एक जिवाणू संसर्ग आहे. सेकँडहँड स्मोकच्या संपर्कात आल्यानेही धोका वाढतो. म्हणूनच, प्रत्येकाने आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी आणि या कर्करोगाला प्रतिबंध करावा.
पोटाच्या कर्करोगाची लक्षणे म्हणजे अपचन, पोटफुगी, मळमळ, भूक न लागणे आणि अस्पष्ट वजन कमी होणे. सुरुवातीला ही लक्षणे सौम्य असू शकतात, त्यामुळे बरेच लोक त्याकडे दुर्लक्ष करतात, ज्यामुळे निदान आणि उपचारांना विलंब होतो. डॉ. मनोज लोखंडे, सर्जिकल ऑन्कोलॉजिस्ट, ऑन्को-लाइफ कॅन्सर सेंटर, सातारा यांनी याबाबत अधिक माहिती दिली आहे.

महत्त्वाच्या टिप्स ज्याने होऊ शकतो धोका कमी

धूम्रपान आणि सेकँडहँड स्मोकींग टाळा. तज्ज्ञांच्या मदतीने धूम्रपानाची सवय सोडण्यासाठी विशेष थेरपीचा वापर करा. कोणत्याही प्रकारच्या कर्करोगापासून बचाव करण्यासाठी धूम्रपान टाळणे ही काळाची गरज आहे. फळे, भाज्या आणि तृणधान्यांनी समृद्ध असा संतुलित आहार घ्या. जंक फुड, तेलकट, हवाबंद डब्यातील आणि प्रक्रिया केलेल्या पदार्थांचे सेवन टाळा.

# इराणच्या तेल साठ्यांवर इस्त्रायलचे भीषण हल्ले

तेहरान दि.८ (वृत्तसेवा):- इस्त्रायलने इराणविरोधात आक्रमक भूमिका घेतली असून शनिवारी इराणच्या अनेक तेल डेपोंवर हल्ले केले. परिणाम तेहरान आणि शेजारील कारज शहर स्फोटांमुळे हादरले होते. यामुळे आकाशात आगीचे आणि धुराचे मोठे लोळ उठले होते. सोशल मीडियावर फिरणा-या व्हीडीओंमध्ये हल्ल्याच्या ठिकाणांहून मोठ्या प्रमाणात ज्वाळांचे लोळ उठताना दिसत आहेत. गेल्या आठवडाभरात अमेरिका आणि इस्त्रायलने इराणच्या सर्व ऊर्जा पायाभूत सुविधांवर हल्ले केले. या हल्ल्यांमध्ये तेहरान आणि अल्बोर्झ प्रांतातील अनेक तेल साठवणूक डेपोंना लक्ष्य करण्यात आले होते. तेहरानच्या पश्चिमेला असलेल्या कारजमधील एका डेपोवरही हा हल्ला झाला. तेहरानचा मुख्य तेल शुद्धीकरण प्रकल्प शहर रे जिल्ह्याजवळ आहे. यावरही हल्ला करण्यात आला होता. वायव्य तेहरानमधील शहरान तेल डेपोवर गेल्या जून महिन्यात हल्ला केला होता. त्यानंतर पुन्हा एकदा हल्ला करण्यात आला. यामुळे आगीची धग अद्यापही कमी झालेली नाही. इराणच्या तेल मंत्रालयाने सांगितले की अग्निशमन आणि आपत्कालीन कर्मचारी आग विझविण्यासाठी काम करत आहेत. या हल्ल्यांमुळे इंधन किंवा ऊर्जेचा तुटवडा निर्माण होणार नाही, यावरही त्यांनी भर दिला. टाइम्स ऑफ इस्त्रायलला दिलेल्या माहितीत, इराणी तेल मंत्रालयाच्या एका सूत्राने पुष्टी केली की पश्चिम तेहरानमधील कुहक आणि शहरान भागातील तीन डेपो तसेच कारजमधील सुविधांवर इस्त्रायली लढाऊ विमानांनी हल्ला केला. इस्त्रायली लष्कराने हल्ल्यांना दुजोरा देत म्हटलं की इंधन साठवणूक आणि ऊर्जा संकुलांचा वापर इराणच्या सशस्त्र दलांकडून केला जात होता. त्यामुळे इस्त्रायलकडून हा हल्ला महत्त्वाचा हल्ला म्हटले जात आहे.

बीड दि.८ (प्रतिनिधी):- शहरातील मोकाट कुत्र्यांचा तात्काळ बंदोबस्त करावा अशी मागणी अनेक ज्येष्ठ नागरिकांनी केली आहे. पहाटेच्या वेळी व्यायामासाठी जायचे तर कुत्र्यांच्या धोक्याचा विचार करुनच जावे लागते असे या नागरिकांचे म्हणने आहे.

# वर्षभरात देशातून सुमारे ३४ हजार मुले बेपत्ता

नवी दिल्ली दि.८ (वृत्तसेवा):- : देशभरात मुलांच्या बेपत्ता होण्याचे आकडे चिंताजनक आहेत. महिला आणि बाल विकास मंत्रालयाच्या मिसिंग चिल्ड्रनच्या ताज्या अहवालानुसार, १ जानेवारी २०२५ ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत देशात एकूण ३३५७७ मुले बेपत्ता झाली. यापैकी ७७७७ मुले अजूनही सापडलेली नाहीत.
अहवालात नमूद केले आहे की, सर्वाधिक १९१४५ मुले पश्चिम बंगालमध्ये बेपत्ता झाली. यापैकी १५४६५ मुलांना शोधण्यात आले, तर ३६८० मुले अजूनही सापडलेली नाहीत. मध्य प्रदेशात ४२५६ मुले बेपत्ता झाली. यापैकी १०५९ मुलांचा अजूनही शोध लागलेला नाही. या ६ राज्यांमध्ये एकाही मुलाच्या बेपत्ता होण्याची नोंद नाही नागालँड, अरुणाचल प्रदेश, मणिपूर, त्रिपुरा, गुजरात आणि लक्षद्वीप व दादरा नगर हवेलीमध्ये मुलांच्या बेपत्ता होण्याची कोणतीही तक्रार मिळालेली नाही.
मैत्रिणीच्या घरी गेली, परत आलीच नाही
अंबाला येथील १४ वर्षीय मुलगी ८ जानेवारी रोजी मैत्रिणीच्या घरी जात असल्याचे सांगून निघाली होती, पण परत आली नाही. बस स्टँडचे सीसीटीव्ही फुटेज मिळाले, ज्यात ती जाताना दिसली, पण पुढे कोणताही सुगावा लागला नाही. अशा प्रकारचे सर्वाधिक उदाहरणे आहेत.
रागावून घरातून निघाली, अजूनही बेपत्ता
अंबाला कॅन्टमध्ये ५ फेब्रुवारी रोजी मुलगी कुटुंबावर रागावून घरातून निघून गेली आणि परत आली नाही. बेपत्ता झाल्याचा गुन्हा दाखल आहे. वडील शहरात पत्रके वाटून लोकांना माहिती देण्याचे आवाहन करत आहेत. असे उदाहरणे दुसऱ्या क्रमांकावर आहेत.

पान १ वरून

## विद्यार्थी आठवडाभर मोबाईलविना

आहे. केंद्राच्या माध्यमातून द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी सात दिवसांचा निवासी प्रशिक्षण अभ्यासक्रम राबवला जाणार आहे.

## आई,बहिणीवरुन जो शिवी देईल त्याला...

निर्णय घेतला. गावात कोणीही आई-बहिणींवरून शिवी दिल्यास त्याचा व्हिडिओ ग्रामपंचायतीकडे सादर केल्यानंतर संबंधित व्यक्तीकडून ५०० रुपयांचा दंड आकारण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. महिलांच्या सन्मानासाठी घेतलेला हा निर्णय गावात चर्चेचा विषय ठरला आहे.

## अमर नाईकवाडेंच्या पाठपुराव्यामुळे कचरा...

यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. त्यानंतर नगर पालिकेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे व अमर नाईकवाडे यांनी एकत्रित खंडेश्वरी मंदिर परिसरात जाऊन स्थळ पाहणी केली व मुख्याधिकाऱ्यांनी सूचना केल्यानंतर दि.८ मार्च पासून या परिसरातील कचरा उचलायला सुरुवात झाली असून तो डम्पींग ग्राऊंडकडे नेऊन टाकला जात आहे.

## केंद्रप्रमुख पदोन्नती प्रक्रियेविरुद्ध संताप

त्याचा अंतीम निर्णय होईपर्यंत किंवा केंद्र सरकारचा धोरणात्मक निर्णय जोपर्यंत येत नाही तोपर्यंत ही प्रक्रिया स्थगित करावी. केंदप्रमुख पदोन्नती प्रक्रिये संदर्भात बीड जिल्ह्यातील अनेक प्रशिक्षीत पदवीधर शिक्षकांनी न्याय मागण्यासाठी छत्रपती संभाजी नगर उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे त्याचा निकाल लागेपर्यंत ही प्रक्रिया स्थगित ठेवावी. जिल्हा परिषदेने २६ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या यादीत अनेक त्रुटी, चुका असल्याने ही यादी सर्वप्रथम रद्द करावी, या यादीवर अनेक शिक्षकांनी आक्षेप नोंदवलेले आहेत त्याची पूर्ण शहानिशा झाल्याशिवाय आणि सदर यादीवर सुनावणी घेतल्याशिवाय पदोन्नती प्रक्रिया राबविण्यात येऊ नये अशी मागणी शिक्षक संघटनेने केलेली आहे. याच मागण्यासाठी शिक्षक संघटना जिल्हा परिषदेसमोर आजपासून उपोषण करत आहेत.

## गॅस सिलेंडरचे दर वाढले...

अमेरिका, इस्त्रायल आणि इराणमध्ये सुरू असलेल्या युद्धामुळे जागतिक पातळीवर परिणाम होत असून, त्याचा फटका भारतालाही बसत आहे. सध्या देशात एलपीजी गॅसची तुटवड्याची परिस्थिती जाणवत आहे, आणि याचा सर्वात मोठा परिणाम हॉटेल उद्योगावर झाला आहे. कमर्शियल एलपीजी गॅसचे दर अचानक १५० ते २०० रुपयांनी वाढले आहेत. त्यामुळे हॉटेल व्यवसाय पुढे कसा चालवायचा, हा प्रश्न व्यावसायिकांसमोर उभा राहिला आहे. दुसरीकडे घरगुती गॅसच्या दरातही ६० रुपयांची वाढ झाल्याने सर्वसामान्यांच्या घराचे गणित बिघडले आहे. त्यातच, गॅस सप्लायही काही शहरांत बंद पडल्याचे पाहायला मिळते. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारणा केली असता, असा कुठलाही प्रकार नाही, माध्यमांनी लोकांना पॅनिक करू नये, भारत सरकारने याबाबत स्पष्टीकरण दिलं आहे, असे सांगितले.

## भारत तिसऱ्यांदा टी-२० वर्ल्ड चॅम्पियन

टी-२० विश्वचषकातील अंतिम सामन्यात सर्वात मोठा पराभव पत्करावा लागला.

भारताच्या टॉप-३ फलंदाजांनी अर्धशतक झळकावले

नाणेफेक गमावल्यानंतर फलंदाजी करणाऱ्या भारताने दमदार सुरुवात केली. पॉवरप्लेमध्ये संघाने विकेट न गमावता ९२ धावा केल्या. संघाने १५ षटकांत २०० धावांचा टप्पा ओलांडला. तथापि, १६ व्या षटकात जिमी नीशमने कर्णधार सूर्यकुमार यादव (०), ईशान किशन (५४ धावा) आणि संजू सॅमसन (८९ धावा) यांना बाद करून भारताच्या धावगतीवर ब्रेक लावला. शेवटच्या पाच षटकांत संघाला फक्त ५२ धावा करता आल्या, त्यापैकी २४ धावा २० व्या षटकातून आल्या.

भारतीय डावात खास विक्रम नोंदवले

संघाने ७.२ षटकांत १०० धावा पूर्ण केल्या आणि टी-२० विश्वचषक नॉकआउट फेरीत संघाकडून सर्वात जलद १०० धावा करण्याचा विक्रम केला.
भारतीय संघाने पॉवरप्लेमध्ये सर्वाधिक विश्वचषक धावसंख्या देखील नोंदवली. याआधीचा विक्रम २०२४ च्या विश्वचषकात ९२/१ होता.
सॅमसनने टी-२० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात सर्वाधिक धावा करणारा फलंदाज बनला आहे आणि त्याने वेस्ट इंडिजच्या मार्लन सॅम्युअल्सचा ८५ धावांचा विक्रम मागे टाकला आहे.

# चीन आणि भारताने एकत्र काम करण्याची गरज

बीजिंग दि.७ (वृत्तसेवा):- चीन आणि भारत या दोन्ही देशांच्या विकासासाठी परस्पर विश्वास आणि सहकार्य आवश्यक आहे. संघर्ष केवळ दोन्ही देशांच्याच नव्हे तर संपूर्ण आशियाच्या विकासात अडथळा आणेल. विशेषतः ब्रिक्समध्ये चीन आणि भारताने एकत्र काम करण्याची गरज आहे असे चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी यांनी म्हटले आहे. त्याशिवाय मध्य पूर्वेत अमेरिका इस्त्रायलने इराणवरील हल्ले थांबवावेत अशी मागणी त्यांनी केली.
बीजिंग येथे १४ व्या नॅशनल पीपुल्स काँग्रेसच्या कार्यक्रमात वांग यांनी चीन आणि भारत यांच्यातील संबंधावर भाष्य केले. ते म्हणाले की, काझानमध्ये चीन-भारत संबंधांची नवी सुरुवात झाली आणि गेल्या ऑगस्टमध्ये तियानजिनमध्ये यात सुधारणा झाली. भारत- चीन हे जवळचे शेजारी आणि ग्लोबल साऊथचा महत्त्वाचा भाग आहेत, ज्यांचे सांस्कृतिक संबंध आणि सामायिक हितसंबंध खोलवर आहेत. त्यामुळे आम्ही सहकार्य आणखी वाढवण्यासाठी वचनबद्ध आहोत असे त्यांनी सांगितले.
दरम्यान, सुरुवातीला ब्रिक्समध्ये ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका यांचा समावेश होता. अलीकडेच इराण, यूएई, इथिओपिया आणि इजिप्तसारखे नवीन देश या गटात सामील झाले आहेत. ब्रिक्स समूह हा अमेरिकेसाठी नेहमीच एक काटा ठरला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी अनेक वेळा ब्रिक्सच्या धोरणावर टीका केली आहे. विशेषतः चीन आणि रशियाने ब्रिक्सला बळकटी देण्यावर सातत्याने भर दिला आहे. त्यामुळे आता चीनने भारतासाठी केलेला मैत्रीचा हात अमेरिकेच्या डोळ्यात खुपणारा आहे.

बीड दि.८ (प्रतिनिधी):- भाजी मंडईत पाणपोई नसल्याने विशेषतः ग्रामीण भागातील नागरिक त्रस्त झाले आहेत. सामाजिक संघटनांनी या भागात पाणपोई सुरु करण्याची मागणी होत आहे.

पान ६ वरून

## एका महिन्यात विवाहितेचे लावले तीन लग्न

आले. इतक्यावरच न थांबता, तुळजापूरच्या एका महिलेच्या मदतीने कानडी बुद्रुक येथील पुरुषाकडून पुन्हा ४.३० लाख रुपये घेऊन १ मार्च २०२६ रोजी तिचे तिसरे लग्न लावून दिले.केवळ एका महिन्यात तीन लग्न लावून तिन्ही ठिकाणाहून पैसे उकळणाऱ्या या रॅकेटने पीडितेच्या आयुष्याचं वाटोळं केलं . जेव्हा एजंटच्या पतीने तिला पुन्हा फोन करून तुला अजून चांगले स्थळ आले आहे, तुझे चौथे लग्न लावून देतो असे सांगितले, तेव्हा नशिबाने खचलेल्या पीडितेने नैराश्यातून विष प्राशन केले. आष्टी तालुक्यातील मिरजगाव येथील रुग्णालयात उपचार घेत असताना पीडितेने आपला जबाब नोंदवला आहे. तिने महानंदा (हडपसर, पुणे), तिचा पती, आणि तुळजापूरची 'बालिका' नावाच्या महिलेसह या कृत्यात सामील असलेल्या इतर आरोपींविरुद्ध आष्टी पोलिसात तक्रार दिली. त्यानुसार शनिवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस आता या प्रकरणाचा अधिक तपास करत असून, यामागे आणखी किती तरुणींचे बळी गेले आहेत, याचा शोध घेत आहेत.

## गेवराई चाळीस फुटाचा रस्ता झाला वीस फूट

राहिला नाही. अतिक्रमण धारकांनी हम करे सौ कायदा या प्रमाणे अतिक्रमण केले आहे. तर काही प्लॉट धारकांनी स्वत : च्या घरा समोर गाळे काढुन अतिक्रमण केले आहे. तर काही कंपाऊड केले आहे .या मुळे ताकडगाव रस्याच्या मुख्य प्रवेशाच्या ठिकाणी येथे मोठी वाहतुकीची कोंडी होती. शाळा,क्लासेस सुटल्यवर तर विद्यार्थ्यांना आपला जिव मुठीत धरून चालावे लागते.अनेकदा येथे अपघात ही झालेत. अनेकांचे जीव ही गेले परंतु हे अतिक्रमन उठवण्याचे धाडस आज पर्यंत कोणाचेही झाले नाही. नगरपालिकेचे मुख्याधिकारी विक्रम मांडूरके यांनी अनेकदा नोटीसा दिल्या.माञ या अतिक्रमण धारकांनी या नोटीसाला जुमानले नाही.नगर परिषदेचे मुख्यधिकारी विक्रम मांडूरके यांनी आताही नोटीसा दिल्या आहेत.आता नोटीसाचा दिखावा नको.अतिक्रमण कधी काढणार आसा सवाल या भागातील नागरिकांनी केला आहे.

## माँ नर्मदा परिक्रमा ३६०० कि.मी.पूर्तीनिमित्त

आत्मिक साधना, श्रद्धा आणि धैर्याची अनुभूती घेतात.डोंगरकिन्ही येथे आयोजित करण्यात आलेल्या या भव्य धार्मिक सोहळ्याला परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## पाणी पुरवठ्याची कामे पावसाळ्यापूर्वी गुणवत्तापूर्ण

यासाठी अधिकाऱ्यांनी नियमित पाहणी करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.दरम्यान, पाटोदा आष्टी व शिरूर कासार नगरपंचायतींमध्ये सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनांचाही आढावा या बैठकीत घेण्यात आला. नगरोत्थान योजनेअंतर्गत सुरू असलेल्या सर्व कामांमध्ये हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही, असा स्पष्ट इशारा देत ठेकेदारांनी नियोजित वेळेत आणि गुणवत्तापूर्ण काम पूर्ण करण्याची सक्त ताकीद आमदार धस यांनी दिली.यावेळी मुख्याधिकारी मुख्याधिकारी अभय जोशी, बाळदत्त मोरे पाटोदा नगराध्यक्ष राजूभैय्या जाधव मुख्याधिकारी गणेश दहिफळे, रोहिदास पाटील गाडेकर, नगराध्यक्ष झिया बेग नगराध्यक्ष तथा नगरसेवक रंगनाथ अण्णा धोंडे, अभियंता बेग, अभियंता शिरसाट, अभियंता कदम तसेच तीनही नगरपंचायतींचे अधिकारी-कर्मचारी व पाणीपुरवठा योजनांचे ठेकेदार उपस्थित होते.

## ३६० खाटांच्या रुग्णालयासाठी ३०४ कोटींची

विभागातही गर्दी वाढल्याने उपचारात अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे तातडीने आवश्यक निधी उपलब्ध करून माता-बालसंगोपन रुग्णालयाची इमारत कार्यान्वित करावी, अशी मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी केली आहे.

## अवैध वाळू वाहतूक करणारा टेम्पो ताब्यात

कारवाई दि. ८ मार्च रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास बीड-मांजरसुंबा रोडवरील कोळवाडी फाटा येथे करण्यात आली.उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा पवार यांच्या आदेशानुसार पोलिसांनी ही कारवाई केली. यावेळी अशोक लेलँड कंपनीचा आयशर टेम्पो (क्रमांक चक १३-उण-४४१९) अवैधरित्या वाळू वाहतूक करताना पकडण्यात आला.टेम्पो चालकाचे नाव अनिल परमेश्वर धोत्रे (वय २५, रा. संगम जवळगाव, ता. गेवराई) असे असून टेम्पोमध्ये अंदाजे ५ ब्रास वाळू आढळून आली. पोलिसांनी संबंधित टेम्पोसह वाळू जप्त केली आहे. जप्त करण्यात आलेल्या वाहनाची किंमत अंदाजे १५ लाख रुपये असून वाळूसह एकूण १५ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.या प्रकरणी संबंधित आरोपीविरुद्ध बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर आणि उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सय्यद, पोलीस अमलदार सचिन आगलावे व घटमळ करांडे यांनी केली.

## अमोल खिलारे याची पीएसआय पदी निवड

पदाधिकारी व गांधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जवाहर भंडारी यांच्या हस्ते अमोलचा सत्कार करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.


दि.०९/०३/२०२६

## जाहीर प्रगटन

आमचे पक्षकार **सुनिता सुभाषचंद्र लोढा, रा. सावतामाळी चौक, ता. जि.बीड** यांनी दिलेल्या माहिती, सुचना व अधिकारावरुन आम जनतेस सुचित करण्यात येते की, आमचे पक्षकाराचे मालकी व ताब्यात तरफ बलगुजार कसबे बीड येथे नगर परिषद हद्दीतील सर्वे नंबर २२२ मध्ये पुर्व -पश्चिम ५० फुट व दक्षिणोत्तर २५ फुट लांबी रुंदीची जागा असुन सदर जागेचा नगरपालिका घर क्रमांक २-१०-७२१ आहे. सदर जागा आमचे पक्षकाराने दिनांक २९-०५-१९९८ रोजी नोंदणीकृत खरेदीखत क्र.१११२/१९९८ अन्वये मुळ मालक शशिकलाबाई हरिभाऊ थोरात यांचेकडुन खरेदी केली आहे. सदर जागेचे उत्तरेस सुनिल सुरजमल लोढा यांचे मालकीची जागा असुन दक्षिणेस आमचे पक्षकाराचे मालकी व ताब्यातील जागा आहे. सुनिल लोढा यांचे जागेचे उत्तरेस पुर्व पश्चिम जाणारा मोंढा रोड असुन सदरचे रस्त्यास येणेजाणेसाठी सर्वे नं. २२२ चे मुळ मालकांनी आमचे पक्षकाराने खरेदी केलेल्या जागेचे पुर्वेकडुन २० फुट रुंदीचा रस्ता ठेवलेला आहे, ज्याचा उल्लेख दि. २९/०५/१९९८ रोजीचे खरेदीखत क्रमांक१११२/१९९८ मध्ये केलेला आहे. असे असताना सदर रस्त्याचे पुर्वेकडील सर्वे नंबर २२२ चे मुळ मालक व त्यांचे वारस वैजनाथ, नवनाथ, साईनाथ व कैलास थोरात हे त्यांचे नावे असलेली ८५४ चौरस मीटर जागा विक्री करत असुन **ते आमचे पक्षकारास त्यांचे प्लॉटमध्ये येणे जाणेस पुर्वेकडुन ठेवणेत आलेला २० फुट रुंदीचा रस्ता नमुद न करता** जागा विक्री करणेचे प्रयत्नात असलेचे समजले आहे, त्यामुळे आमचे पक्षकार सदर प्रगटनाद्वारे सुचीत करतात की, सर्वे नंबर २२२ मधील जागे बाबत मुळ मालकाशी व्यवहार करताना आमचे पक्षकाराचे जागेचे पुर्वेस असलेल्या २० फुट रुंदीचा रस्ता तथा सदर रस्त्याचे जागेसह खरेदी विक्रीचा व्यवहार करु नये, केल्यास सदरचा व्यवहार आमचे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही. करीता हे जाहीर प्रगटन.

– प्रगटन देणार –
**सुनिता भ्र. सुभाषचंद्र लोढा**

**मार्फत :–**
**ॲड. पी.एस. राजापुरकर.**
चंदन हॉटेलच्या पाठीमागे,
आदर्श गणेश नगर, बीड.
मो.नं. ९४२२८८२०६०

16575-13454


हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक गंमत भंडारी यांनी शाम प्रिंटर्स, नवी भाजी मंडई बीड येथे छापून पार्श्वभूमी कार्यालय, नवी भाजी मंडई रोड, बीड येथे प्रकाशित केले. फोन नं. (०२४४२) २३०१०१.
AR/TECH/Regd. N.P./34/Beed/99-2000 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 E-mail Address-parshvabhoomi@gmail.com

## अरहान शेख यांने पहिला रोजा करुन शेख कुटुंबियांचा वाढवला अभिमान

गेवराई. दि ८(प्रतिनिधी) - पवित्र रमजान महिन्यालाइस्लाम धर्मात अनन्य साधारण महत्त्व असुन या महिन्यात मुस्लिम समाजातील बहुतांश महिला पुरुष सा वर्षापुढील महिला व पुरुष यांना या महिन्यात उपवास (रोजा) हा ठेवण्यासाठी आवश्यक समजला जातो. या पवित्र रमजान महिन्यात श्रद्धा, संयम आणि सबुरीचे विशेष महत्त्व आहे. गेवराई येथील आठ वर्षांच्या अरहान उस्मान शेख यांने आपल्या आयुष्यातील पहिला रोजा (उपवास) पूर्ण करून शेख कुटुंबियांचा अभिमान वाढवला आहे.


# पार्श्वभूमी

दिनांक ९ मार्च २०२६ पान -३



## भारतीय महिला फेडरेशनच्या वतीने जागतिक महिला दिन साजरा

बीड दि. ८ (प्रतिनिधी) भारतीय महिला फेडरेशनच्या बीड जिल्हा शाखेच्या वतीने जागतिक महिला दिनाचा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात जाला. अध्यक्षस्थानी श्रीमती आशाताई चव्हाण होत्या. प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्रीमती कोमल मस्के यांचे भाषण झाले.सर्व प्रथम सावित्रीमाता फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केल्यानंतर श्रीमती रंजना हुरकुडे यांनी प्रास्तविकपर भाषणात जागतिक महिला दिनाचा इतिहास आणि आपल्या देशातील महिला आंदोलनाचा थोडक्यात आढावा घेतला. त्याचप्रमाणे श्रीमती कोमल मस्के यांनी भारतातील महिला नेतृत्वाची परंपरा आणि त्याग याबाबत माहिती दिली.

# नायगावच्या मयूर अभयारण्यात कोणी मोर दाखवता का मोर!

बीड दि ८( गोरखनाथ चिंचोलीकर)- एक काळ असा होता की, पाटोदा तालुक्यातील नायगाव मयूर येथे शिवारामध्ये सकाळच्या प्रहरी भारताचा राष्ट्रीय पक्षी असलेल्या मोरांचे ओरडणे शिवाय गर्द झाडीवर बसलेले अथवा पीकं निघालेल्या शेतात झाडाखाली थांबणारे मोरांचे थवे पाहून बीडहून नगरला जाताना किंवा नगर होऊन बीड कडे येताना कोणतेही खाजगी वाहन थांबल्याशिवाय राहत नव्हते. या खाजगी वाहनातील कुटुंब दहा-वीस मिनिट थांबून मोराकडे कूतूहालाने पाहत असत. ज्यांच्याकडे कॅमेरे होते ते मोरांची छबी टिपण्यासाठी वेळ घालवत. अशा नायगाव मयूरला आशिया खंडातील मोराचे अभयारण्य घोषित करण्यात आले. पण आज अशी परिस्थिती दिसून येत आहे की, कोणत्या ना कोणत्या कारणाने या परिसरातून मोराचे स्थलांतर झालेले दिसून येते. सद्यस्थितीला या अभयारण्यात क्वचित मोर पाहायला मिळतात. जाणाऱ्या येणाऱ्या दूरवरच्या लोकांनी मयूर अभयारण्य अशी पाटी वाचल्यानंतर चौफेर त्यांच्या नजरा लागतात. परंतु मोर काही दिसत नाही. तेव्हा अशाच एक व्यक्तीच्या तोंडातून नायगावच्या मयूर अभयारण्यात कोणी मोर दाखवता का हो मोर! असे उद्गार ऐकण्यात मिळाले.

मागील काही वर्षाखाली म्हणजे वीस-पंचवीस वर्षाखाली नायगाव परिसरामध्ये मोरांची एवढी प्रचंड संख्या होती की ती शासनाच्या नजरेस आणून देण्याचे काम त्यावेळी बीड संचार या सांय दैनिकाचे संपादक कै. कालिदास गनोरकर यांनी सतत केले. आपल्या वर्तमानपत्रातून दररोज यासंदर्भात रखानेचे रखाने बातम्या देऊन व प्रश्न उपस्थित करून वन खात्याला व या खात्याच्या तत्कालीन मंत्र्याना जागृत करण्याचे काम केले. एवढेच नव्हे तर नायगाव येथे मयूर अभयारण्य व्हावे म्हणून आंदोलने देखील केली. त्यामुळे आशिया खंडात पहिले मयूर अभयारण्य बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यात असलेल्या नायगाव येथे मंजूर झाले. त्यासाठी शासनाकडून दरवर्षी मोठ्या प्रमाणात निधी येऊ लागला. परंतु संबंधित खात्याने मात्र याची पाहिजे तशी दक्षता घेतली नसल्याचे दिसून येऊ लागले. आज अशी अवस्था आहे की, या मयूर अभयारण्य वीस-पंचवीस वर्षाखाली जेवढी मोरांची संख्या दिसून येत होती त्याच्या दहा टक्के देखील राहिली नाही असे म्हणण्याची वेळ आली. याची कारणे काहीही असोत, परंतु या परिसरातील मोरांनी पाटोदा तालुक्यातून जात असलेल्या मांजरा नदी काठच्या गर्द झाडीचा आश्रय घेत बालाघाट पासून थेट केज तालुक्यातील हादगाव शिवारापर्यंत वास्तव्य केल्याचे दिसून येऊ लागले आहे. याशिवाय शिरूर कासार तालुका, बीड तालुक्यातील नवगण राजुरी शिवार असो की याच तालुक्यातील पांगरी आदी परिसरात मोरांचे वास्तव्य असल्याचे दिसून येत आहे. मयूर अभयारण्यातून मोर का कमी झाले? त्यांनी स्थलांतर का केले? या संदर्भात कोणीही विचारमंथन करायला अथवा दखल घ्यायला तयार नाही. शासनाकडून मोठ्या प्रमाणात निधी येतो तो कशा कशावर खर्च केला? याची आकडेवारी देखभाल करणारे संबंधित खात्याचे अधिकारी कर्मचारी देतात. शासनाचा निधी एवढ्या मोठ्या प्रमाणात राष्ट्रीय पक्षासाठी खर्च होत असेल तर मोरांचे का? स्थलांतर व्हावे, किंवा संख्या कमी का? व्हावी. याच्या संदर्भात कोणीही शब्द काढायला तयार नाही. या रस्त्यावरून जेव्हा खाजगी वाहनाने नागरिक जातात किंवा बसमधून जाणारे प्रवासी नायगाव मयूर ते घाटापर्यंत त्यांचे पूर्व बाजूला लक्ष राहते परंतु मोर काही दिसत नाही?. ही अवस्था कशामुळे झाली यासंदर्भात शासन देखील लक्ष द्यायला तयार नाही. यासंदर्भात एका पक्षी मित्राला विचारण्या केल्यानंतर या मयूर अभयारण्यात या राष्ट्रीय पक्षांना पोट भरण्यासाठी जे खाद्य हवे आहेत ते तेवढ्या मुबलक प्रमाणात नाही. उन्हाळ्यात पाण्याची कमतरता आणि ते उपलब्ध करण्याची जबाबदारी असलेले संबंधित खाते



देखील दखल घेत नाही. यामुळे मोरांनी स्थलांतर केले असावे, असा निष्कर्ष काढला. तेव्हा नगर रोड वरून जाणारा व्यक्ती जर या मयूर अभयारण्यात कोणी मोर दाखवता का हो मोर! असे उद्गार काढीत असेल तर या संदर्भात कोणाला जबाबदार धरावे? आणि ते जबाबदार धरण्याचे धाडस संबंधित विभाग करेल आहे? असा देखील प्रश्न निर्माण होत आहे.

## शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेतीकडे वाटचाल करणे काळाची गरज-डॉ.इन्द्र मणी

गेवराई दि.८ ( प्रतिनिधी) - शेतीमध्ये रासायनिक कीटकनाशक, बुरशीनाशक आणि तणनाशकाचा वापर कमी करुन जास्तीत जास्त जैविक निविष्ठांचा वापर करावा जेणेकरुन शेतकऱ्यांचा उत्पन्नावरील खर्च कमी होऊन उत्पादनात अधिक वाढ होईल व जमिनीचे आरोग्य देखील अबाधित राहते. त्यामुळे शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेतीकडे वाटचाल करणे काळाची गरज आहे असे प्रतिपादन वनामकृवि, परभणीचे कुलगुरु डॉ. इन्द्र मणी यांनी केले.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी आणि कृषी विज्ञान खामगाव बीड यांच्या वतीने ६ मार्च रोजी ८८ वा शेतकरी शास्त्रज्ञ ऑनलाईन सुसंवाद कार्यक्रम संपन्न झाला. अध्यक्षस्थानी वनामकृवि,परभणीचे कुलगुरु डॉ. इन्द्र मणी तर प्रमुख म्हणून संचालक डॉ.राकेश अहिरे, बीड जिल्हा अधीक्षक सुभाष साळवे, मुख्य विस्तार शिक्षण अधिकारी डॉ. प्रशांत देशमुख, प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. एलिजा प्रधान, प्रा.अरुण गुट्टे हे होते. पुढे बोलताना कुलगुरु डॉ.इन्द्र मणी म्हणाले की, नैसर्गिक शेतीविषयक शेती करण्यासाठी शेतकरी बांधवाना मोठ्या प्रमाणात प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. आणि यासाठी विद्यापीठ मोठ्या प्रमाणावर उपक्रम राबवत आहे. यावेळी डॉ. एलिजा प्रधान यांनी ऊस पिकातील पाचट व अन्नद्रव्ये व्यवस्थापण या विषयी बोलताना पाचट जाळण्याचे दुष्परिणाम सांगताना जमिनीतील जिवाणूंची संख्या कमी होते, सेंद्रिय कर्ब घटते, पर्यावरणाचे प्रदूषण होते असे नमूद केले. दरम्यान यावेळी शेतकरी बांधवांनी विचारलेल्या विविध प्रश्नांची उपस्थित शास्त्रज्ञा मार्फत उत्तरे देण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. हनुमान गरुड तर आभार डॉ. भैय्यासाहेब गायकवाड यांनी केले.

## लोककला संवर्धन आणि जतन याविषयावर सौ.के.एस.के महाविद्यालयात बुधवारी राष्ट्रीय कार्यशाळा

बीड ( प्रतिनिधी) येथील सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात नाट्यशास्त्र विभाग, संगीत विभाग आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ११ मार्च २०२६ रोजी लोककला संवर्धन व जतन या विषयावर राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात येत असल्याचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर आणि कार्यशाळा समन्वयक तथा उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळाणकर यांनी कळविले आहे.दिनांक ११ मार्च २०२६ रोजी सौ. के. एस. के. महाविद्यालयात लोककलेच्या कार्यशाळेचे आयोजन सकाळी १०.०० वाजेपासून होणार आहे. मुंबई विद्यापीठाचे लोककला अकादमीचे प्रमुख डॉ. गणेश चंदनशिवे तसेच प्रमुख अतिथी म्हणून बीड नाट्य परिषदेच्या अध्यक्ष, प्राचार्य दीपा क्षीरसागर, नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. योगेश क्षीरसागर उपस्थित राहणार आहेत या कार्यशाळेत लोककलेचे सादरीकरण आणि त्यावर चर्चा होणार आहे, यात डॉ. गणेश चंदनशिवे,मुंबई. शाहीर संतोष साळुंके, लातूर . डॉ.साहिश देशपांडे, गोवा. गोमंत लोककला, डॉ. सुधीर निकम, बीड. डॉ. गणेश शिंदे , धाराशिव. शाहीर विलास सोनवणे, गेवराई. अनामिका आहिरे, बीड हमीद असीम सय्यद, शेवगाव, भगवान राऊत, अहिल्यानगर. विलास हरगावकर, आदी तज्ञ अभ्यासकांचे सादरीकरण आणि मार्गदर्शन होणार आहे. तसेच लोकवाद्य प्रदर्शन आणि लोक वाद्यवृंद सादरीकरण यात डॉ. राहुल सोनवणे, प्रा. दीपक जमदाडे, सुरेश थोरात, पवन शिंदे, नितीन प्रधान, इंद्रजीत भांगे, आदिंचे सादरीकरण होणार आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर या विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांतील लोककलेचा सर्वेक्षण अहवाल डॉ. जयंत शेवतेकर सादर करणार आहे. कार्यशाळे दरम्यान येणाऱ्या सहभागी प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी, अभ्यासक, कलावंत यांनी आपले संशोधन निबंध पाठवावे असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, कार्यशाळा समन्वय उपप्राचार्य तथा नाट्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संजय पाटील देवळाणकर, उपप्राचार्य अनिता शिंदे, पदव्युत्त विभाग प्रमुख डॉ. खान ए. एस., डॉ राहुल सोनवणे डॉ. दुष्यंत रामटेके, प्रा. विजयकुमार राख, डॉ.असलम सय्यद आदींनी केले आहे

## केज मतदार संघातील दोन रस्त्यांच्या सुधारणेसाठी २५ कोटींच्या निधीची तरतूद

### आ.नमिता मुंदडा यांच्या पाठपुराव्याला यश

केज दि ८ (प्रतिनिधी) -मार्च २०२६ च्या अर्थसंकल्पीय नियोजनात केज आणि अंबाजोगाई तालुक्यातील दोन प्रमुख रस्ते कामा साठी २५ कोटींच्या निधी ची तरतूद करण्यात आली आहे. प्रस्तावित कामांनुसार धारूर, तांदळवाडी, उंदरी, कळम अंबा आणि होळ या गावांना जोडणाऱ्या मार्गावरील ९.५० किलोमिटर लांबीच्या रस्त्यासाठी रुंदीकरणा सह सुधारणा करण्यात येणार आहे. यासाठी केज विधानसभेचे आमदार नमिता मुंदडा यांनी केलेल्या पाठपुराव्यला यश आले

अंबाजोगाई तालुक्यातील नागापूर, साकूड ते अंबाजोगाई या दरम्यानच्या १५ किलो मीटर लांबीच्या रस्त्याचे ही रुंदीकरण व सुधारणा करण्याचे काम अर्थ संकल्पात प्रस्तावित करण्यात आले असून त्यासाठी १५ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद देखील करण्यात आली आहे. आ. नमिता मुंदडा यांनी या कामांसाठी संबंधित विभागांकडे सातत्याने मागणी लावून धरली होती.या दोन्ही कामांची एकूण लांबी २४.५० किलोमीटर असून, राज्य महामार्ग आणि मुख्य जिल्हा मार्ग अंतर्गत ही विकासकामे पूर्ण केली जाणार आहेत. या रस्ते सुधारणेमुळे ग्रामीण भागातील दळणवळण सुलभ होणार असून स्थानिक व्यापार आणि प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. यासाठी मुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री पंकजाताई मुंडे यांचे आ. नमिता मुंदडा यांनी आभार मानले आहेत.

## मान्यताप्राप्त नसलेल्या संघटनांची निवेदने कार्यवाहीवेळी विचारात घेता येणार नाहीत

### आठवले यांच्या मागणीला आले यश

बीड दि ८(प्रतिनिधी)-सद्यस्थितीत शासकीय व निमशासकीय कार्यालयात विविध संवर्गात मोठ्या प्रमाणात अधिकारी कर्मचारी कार्यरत आहेत. परंतु यातील शासन मान्यता प्राप्त संघटना नसतानाही असे कर्मचारी लेटरहेड वर शासन मान्यता असा नामोल्लेख करून शासनाकडे मोठ्या प्रमाणात निवेदन देऊन काही श्रमिक अधिनियमाखाली नोंदणीकृत संघटनांचे पदाधिकारी शासनाची दिशाभूलकरत शासनास वेठीस धरतात. या गैरप्रकाराला प्रतिबंधित करण्याकरिता दिनांक २ जानेवारी २०१७ रोजी शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने अशा प्रकरणी शासन मान्यता नसलेल्या संघटना पदाधिकाऱ्यांनी निवेदन देऊन पत्रव्यवहार केल्यास अशा संघटना पदाधिकाऱ्यांविरुद्ध कठोरात कठोर कार्यवाही करण्याबाबत आदेश निर्गमित केले होते. या आदेशाच्या सुचीमधे दिव्यांग कर्मचारी संघटना प्रदेश अध्यक्ष साईनाथ पवार यांच्या अध्यक्षतेखाली मान्यता असलेल्या महाराष्ट्र राज्य दिव्यांग / अपंग कर्मचारी संघटना या संघटनेच्या नावाचा शासनाच्या यादीमध्ये अनु.क्र.२४६ नुसार नामोल्लेख करण्यात आला आहे.मान्यताप्राप्त नसलेल्या संघटना या शासनाची दिशाभूल करतात याप्रकरणी शासन मान्यता प्राप्त दिव्यांग कर्मचारी संघटना प्रदेश उपाध्यक्ष अशोक आठवले यांच्या आग्रहाच्या पाठपुराव्याने यापूर्वीच अशा मान्यताप्राप्त नसलेल्या संघटना पदाधिकाऱ्यांविरुद्ध कठोरात कठोर कार्यवाही करण्याबाबत तक्रार निवेदन दिले होत.म्हणून आठवले यांच्या तक्रार निवेदनाची दखल घेऊन परिपत्रकास अनुसरून दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांच्या आदेशावरुन दिनांक ३ फेब्रुवारी २०२६ रोजी अवर सचिव.साईप्रसाद मुकदडवार यांच्या स्वाक्षरीने दिव्यांग कल्याण क्षेत्रात शासन मान्यता नसलेल्या संघटना पदाधिकाऱ्यांविरुद्ध राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, सर्व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व विभागीय आयुक्त, सर्व महापालिका आयुक्त या प्राधिकरणांना कार्यवाहीचे आदेश जारी केले आहेत. या स्वरूपाची माहिती शासन मान्यता प्राप्त महाराष्ट्र राज्य दिव्यांग कर्मचारी संघटना प्रदेश उपाध्यक्ष अशोक आठवले यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये दिली आहे.

## सापांच्या मिलनकाळात सावधानता बाळगावी

पिंपळनेर दि ८ (प्रतिनिधी)- सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरू झालेले आहेत. तापमानातील बदलामुळे साप देखील बाहेर पडत असताना नुकतेच नाग व धामण या सापांचा मिलनकाळ सुरू झाल्याने सर्पदंशाचा धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही तेव्हा नागरिकांनी विशेषतः शेतकऱ्यांनी सावध राहण्याचे आवाहन सर्पमित्रांनी केले आहे.

साप हा जमिनीवर सरपटणारा प्राणी असून, उन्हाळ्याच्या दिवसामध्ये जमिनीवरील तापमानात बदल होत असतो. त्यामुळे गारव्याच्या तसेच भक्षाच्या शोधात साप देखील बाहेर पडत असतात. सध्या काही सापांचा मिलनकाळ असल्यामुळे दोन किंवा त्यापेक्षा जास्त साप वारंवार दिसत आहेत. उन्हामुळे सापांची हालचाल जास्त वाढलेली असल्याने साप चिडलेल्या अवस्थेत असतात. त्यामुळे त्यांचा दंश होण्याचे प्रमाण सुद्धा वाढत असल्याने नागरिकांनी व शेतकऱ्यांनी शेतात काम करताना सावधानता बाळगत खबरदारी घ्यावी .तर परिसरात आढळणारे सर्व साप विषारी नसून फक्त फुरसे, घोणस, नाग, मण्यार, पोवळा हे साप विषारी असून कोणाला सर्पदंश झाल्यास त्याला उपचारासाठी तातडीने जवळील शासकीय रुग्णालयात नेण्याची आवश्यकता आहे. उन्हाळ्यामध्ये सापांचे विष काही प्रमाणात पातळ झाल्याने सर्पदंश झाल्यास विष जलदगतीने शरीरात पसरते. त्यामुळे नागरिकांनी सापांपासून सावध राहावे व कोठे सर्पदंशाची घटना घडल्यास घाबरून न जाता तातडीने जवळील शासकीय रुग्णालयात दाखल व्हावे. असे आवाहन पिंपळनेर ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. चव्हाण यांनीही केले आहे. तर परिसरात कुठे साप दिसल्यास नागरिकांनी त्यांच्या पासून लांब रहावे व वनविभाग तसेच सर्पमित्रांशी संपर्क साधावा. असे आवाहन निसर्ग वन्यजीव सामाजिक संस्थेचे प्रमुख राहुल सिरसाट यांनी केले आहे.

## बबनराव आंधळे समाजरत्न पुरस्काराने सन्मानित

बीड दि ८(प्रतिनिधी)- विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना मातृभूमी प्रतिष्ठानकडून राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यामध्ये ''राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार २०२६'' हा सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि सहकार क्षेत्रात गेली सुमारे २५ वर्षे अविरत कार्य करणाऱ्या प्रा. बबनराव आंधळे यांना हा पुरस्कार , शिक्षणमहर्षी प्रा. सुशीलाताई मोराळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

प्रा. आंधळे हे बीड जिल्हा सहकार बोर्डाचे संचालक, संत तुकाराम प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक, तसेच ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. याशिवाय ते अरुणा असफअली शिक्षण संस्था कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन आणि सावता नागरी सहकारी पतसंस्थेचे संचालक म्हणूनही कार्य करत आहेत. बीड येथील श्री संत भगवान बाबा सामाजिक प्रतिष्ठानमध्ये आयोजित वंजारी समाज वधू-वर सूचक मेळाव्यात या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाला हरिभक्त परायण मोहन महाराज खरमाटे, राज्य ऊसतोड कामगार नेते गहिनीनाथ थोरे, इंजिनिअर उत्तमराव मिसाळ, मोहनराव शिरसाट, प्रा. आर. टी. गर्जे, डॉ. संजय तांदळे, प्राचार्य नागरगोजे सर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## आ.नमिता मुंदडा यांचा वाढदिवस व महिला दिनाचे महिला दिना निमित्त टेम्पो मधून स्मार्ट कार्ड वाटप

अंबाजोगाई दि ८ (प्रतिनिधी)- आ. नमिता मुंदडा यांच्या जन्मदिनानिमित्त तसेच महिला दिना निमित्त राजस्थानी मंगल कार्यालय येथे माहेश्वरी समाजाच्या वतीने कॅम्पचे आयोजन करून सर्वांसाठी स्मार्ट कार्डचे वाटप करण्यात आले.

या स्मार्ट कार्ड कॅम्पचे उद्घाटन अक्षय भैय्या मुंदडा यांच्या हस्ते महेश भगवान प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. यावेळी त्यांच्या सह भाजपा शहर अध्यक्ष व नगरसेवक संजय गंभीरे ,माहेश्वरी समाजाचे महिला मंडळाचे पदाधिकारी व समाज बांधव उपस्थित होते. यावेळी उपस्थित नागरिकांना अवश्यक दस्तावेज घेऊन सार्ट कार्ड चे वितरण करण्यास सुरुवात केली. यावेळी समाजातील मान्यवराच्या उपस्थित या स्मार्ट कार्ड लाभार्थींना देण्यास



सुरुवात झाली. एसटी बसने प्रवास करताना जर नागरिकास सवलतीचा लाभ घ्यावा असेल तर त्यांना राज्य सरकारने या सवलती साठी एनसीएमसी हे स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्यात आले हे कार्ड असेल तर सवलतदारांना या विशेष सवलीतीचा लाभ घेता येणार आहे अशी घोषणा राज्य शासनाने केली.यावेळी माहेश्वरी महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ पुनम मुंदडा , सौ अर्चना मुंदडा व माहेश्वरी महिला मंडळाचे इतर महिला सदस्य तसेच बीड जिल्हा माहेश्वरी मंडळाचे अध्यक्ष ललित तोष्णीवाल , बीड जिल्हा माहेश्वरी युवा अध्यक्ष रोहन मुंदड, अंबेजोगाई तालुका माहेश्वरी अध्यक्ष दत्तप्रसाद लोहिया, सचिव सतिष तोष्णीवाल, संजय लोहिया, गुलाब सारडा, राजेंद्र दरक, संतोष भंडारी, सुभाष बाहेती, तसेच माहेश्वरी समाजातील बांधव उपस्थित होते

## केज पं.समितीमध्ये मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेची बैठक संपन्न

केज दि ८ (प्रतिनिधी) पंचायत समिती कार्यालय केज येथे मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना प्रभावीपणे सुरू करण्या साठी तसेच ती गावागावात गतिमान व पारदर्शक पद्धतीने राबविण्याच्या दृष्टीने केज येथील पंचायत समिती कार्यालयात आढावा बैठक घेण्यात आली.

शेतकरी बांधवांच्या शेतापर्यंत सुलभ दळणवळणाची सुविधा निर्माण होणे ही काळाची गरज आहे. पावसाळ्यात शेतात जाण्यासाठी होणारा त्रास, उत्पादन बाजारपेठेत पोहोचवताना येणाऱ्या अडचणी तसेच आपत्कालीन परिस्थितीत होणारी गैरसोय दूर करण्यासाठी मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या बैठकीत संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यां सोबत या योजनेची कार्यपद्धती अधिकसोपी, सुलभ व कालबद्ध करण्याबाबत मार्गदर्शक सूचना दिल्या.राज्यात शेतकऱ्यांच्या आयुष्यात क्रांती घडवणारी मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजना राबविण्याचा शासनाचा निर्णय स्वागतार्ह असून शासनाचे कौतुक आहे. याचबरोबर मातोश्री पाणंद रस्ते योजनाही सुरू राहणार असून या योजनेतील त्रुटी दूर करण्याबाबतही चर्चा करण्यात आली. या बैठकीस अंबाजोगाई चे नगराध्यक्ष नंदकिशोर (काकाजी) मुंदडा, समितीचे सचिव उपविभागीय अधिकारी दिपक वजाळे , केजचे तहसीलदार राकेश गिड्डे , अंबाजोगाईचे तहसीलदार विलास तरंगे , बीड गट विकास अधिकारी तसेच तीनही तालुक्यांतील विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

## संस्कारमध्ये आनंददायी शनिवार या उपक्रमाला पालकांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद

बीड दि ८ (प्रतिनिधी)- येथील संस्कार विद्यालयातील इयत्ता पहिली दुसरी विभागात शासनाने ठरवून दिलेल्या आनंददायी शनिवार या उपक्रमांतर्गत पाठ्यक्रमावर आधारित विविध शैक्षणिक कृतींचे प्रत्येक शनिवारी निरंतर आयोजन करण्यात येते.

या उपक्रमांतर्गत मराठी कविता ,कला गीते अभिनयासह शिक्षकांनी सादर करतात व विद्यार्थ्यांकडून करून घेतली जातात . गणित विषयातील भूमितीय आकारांची ओळख ,भारतीय नाणी - नोटाची ओळख, पाढे पाठांतर , एकक - दशक संकल्पना, मूल्यवाचक व क्रम वाचक संख्येतील फरक हे घटक शैक्षणिक साहित्याचा वापर करून प्रात्यक्षिकरित्या शिकवली जाण्याबरोबरच विविध विषय हाताळले जातात . या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या विविध विषयातील अध्ययन क्षमता दृढ होण्यास मदत होते. त्यानुसार या उपक्रमास पालकही उत्स्फूर्त प्रतिसाद देत आहेत.

## श्रीक्षेत्र बप्पाजी बाबा संस्थान येथे मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न



बीड दि ८ (प्रतिनिधी)- तालुक्यातील मौजे बांगरवाडा येथील श्रीक्षेत्र बप्पाजी बाबा संतसेवा आश्रम येथे गुरुवार ५ मार्च रोजी मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा धार्मिक वातावरणात संपन्न झाला.

यावेळीभगवान श्रीकृष्ण,तपोनिधी ईश्वर भारती महाराज, वाचासिद्धि श्रीसंत बप्पाजी बाबा, वैराग्याचे महामेरू श्रीसंत वामनभाऊ,ऐश्वर्यसंपन्न श्रीसंत भगवान बाबा इत्यादी संतांच्या मूर्ती प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. यावेळी ह.भ.प.महंत कृष्णा महाराज शास्त्री, बेलेश्वर संस्थानचे ह.भ.प.महंत महादेव महाराज भारती, महादेव मळी कुर्ला संस्थानचे महंत ह.भ.प.दत्ता महाराज बडगे, ह.भ.प.सुनील महाराज केकान,अनंत महाराज मुळे,भारतीय क्रिकेटपटू संजय बांगर यांचे वडील बापुराव गणपतराव बांगर, मारोतराव वनवे .शरद बडगे , पंडितजी माने , अमोल माने , डॉ. अभय वनवे यांचे सह परिसरातील सर्व क्षेत्रातील मान्यवर मंडळी उपस्थित होते.आणि पंचक्रोशीतील शेकडो भाविक भक्त उपस्थित होते. तसेच यावेळी महंत दत्ता महाराज बडगे यांची प्रवचनरुपी सेवा पार पडले नंतर महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## पाटोद्यातील १३ शाळांना दिला एलसीडी टीव्ही संच भेट

पाटोदा दि ८ (प्रतिनिधी)- सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती २०२६ च्या वतीने समितीचे अध्यक्ष संतोष दादा जाधव यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या कार्यक्रमात शहरातील शाळांमधील निराधार विद्यार्थ्यांना दप्तर किट भेट दिली. याशिवाय विद्यार्थ्यांना आधुनिक व डिजिटल शिक्षणाची सुविधा मिळावी या उद्देशाने सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सहभागी झालेल्या शाळांना एलसीडी टीव्ही संच देण्यात आले. समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व शिवप्रेमींनी परिश्रम घेऊन हा उपक्रम यशस्वीपणे पार पाडला. या उपक्रमांतर्गत श्रीमती लक्ष्मीबाई कन्या प्रशाला, भामेश्वर विद्यालय, वसंतराव नाईक विद्यालय, नवनिर्माण विद्यालय, संत तुकाराम विद्यालय, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, लिटल फ्लॉवर इंग्लिश स्कूल, योगीराज इंग्लिश स्कूल, संत बाळूदेव विद्यालय, प्रियदर्शनी विद्यालय तसेच जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा आदी शाळांना एलसीडी टीव्ही संच उपलब्ध करून देण्यात आले. या संचांचे वितरण शिवजयंती उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आले.

# संपादकीय

## भविष्यवेधी संकल्प

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत 'समृद्ध महाराष्ट्राचा भविष्यवेधी अर्थसंकल्प' सादर केला. नव्या पिढीतील नेतृत्वाकडे राज्यांची सूत्रं गेल्यापासून साधारणतः गेल्या दहा वर्षांत देशातील अनेक राज्यांत परकीय गुंतवणुकीसाठी, केंद्राच्या योजनांमध्ये अधिक वाटा मिळवण्यासाठी, नवोद्योग आणि नवोपचारांना आकर्षित करण्यासाठी, पायाभूत सुविधांच्या विस्तारातून आपलं राज्य अधिकाधिक उद्योगस्नेही करण्यासाठी निकोप स्पर्धा सुरू आहे. या सर्व नवनेतृत्वामध्ये फडणवीस यांचा नंबर सर्वात वर आहे. त्यामुळे, महाराष्ट्रातील कारभाराकडे, इथल्या योजना आणि त्यासाठीच्या विविध तरतुदींकडे इतर राज्यांचं बारकाईने लक्ष असतं. त्या सर्व विकासेच्छु नवनेतृत्वाने अनुकरण करावं, असाच महाराष्ट्राचा यंदाचा अर्थसंकल्प आहे, यात वाद नाही. फडणवीस यांच्या दूरदृष्टीचा, सम्यक विचारांचा आणि विकासशील नीतीचा प्रत्यय त्यातील वाक्या-वाक्यातून येतो आहे. कोणत्याही राज्याचा अर्थसंकल्प म्हणजे मुद्दलात 'जमा-खर्चाचा वार्षिक ताळेबंद'च असतो. पण, राज्याच्या उत्पन्नाचे स्त्रोत काय आहेत आणि उत्पन्नाचा विनियोग राज्यकर्ते कोणत्या प्राधान्यक्रमाने करताहेत, यावरून राज्याचा इतिहास-वर्तमान आणि भविष्य अशा तीनही काळांचं स्वच्छ दर्शन होतं. सामाजिक व्यवहाराच्या प्रत्येक क्षेत्राचा विचार करून, त्यातल्या बाबींवर भरघोस तरतुदी करूनही राजकोषीय तूट स्थूल उत्पन्नाच्या तीन टक्क्यांच्या आत ठेवण्याचं कौशल्य अर्थसंकल्पात साधलं आहे, हे विशेष. देशातली सगळीच राज्यं कर्जांच्या ओझ्याखाली वाकत चालली आहेत. वाढतं शहरीकरण, या शहरांना सुविधा पुरवण्याचा ताण, अस्थिर राजकारण आणि त्यामुळे करावा लागणारा मतदाराचा अधिकाधिक अनुनय, त्यातून आलेल्या 'फुकट वाटप योजना' आणि कर आकारणीचं केंद्रीकरण, यांमुळे राज्य कात्रीत सापडली आहेत. महाराष्ट्र यात वेगळा नाही. तरीही यावेळचा अर्थसंकल्प सर्वंकष वाटतो आहे, तो फडणवीस यांच्या धाडस आणि आत्मविश्वासामुळे. वातावरणीय बदल, पर्यावरणाचं रक्षण, सार्वजनिक स्वच्छता, नैसर्गिक संसाधनांचे कार्यक्षम व्यवस्थापन आणि किफायती वापर, अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराला प्रोत्साहन, त्यासाठी तंत्रशिक्षणाचा प्रसार, सर्वांसाठी आरोग्य आणि रोजगाराच्या पुरेशा संधी हे आजच्या 'जेन-झीं'चे जिव्हाळ्याचे मुद्दे आहेत. अर्थसंकल्पाने या सगळ्याच क्षेत्रांना योग्यरीत्या न्याय दिला असून त्यातून राज्याची भविष्याची दिशाही स्पष्ट केली आहे. राज्यासाठी आणि राज्यातील जनतेसाठी अत्यंत दिलासादायक अर्थसंकल्प म्हणून या अर्थसंकल्पाची नोंद करावी लागेल. महाराष्ट्र हे देशातील विकसित राज्य आहे. विकसित राज्यासमोरही अनेक आव्हानं असतात. मागास राज्यांची थोडीशी प्रगतीही आकड्यांमध्ये, टक्केवारीत मोठी दिसते. विकसित राज्यांचं तसं नसतं. एका विशिष्ट स्थितीला पोहोचल्यानंतर त्यानंतरची प्रगती आकड्यांमध्ये धीम्या गतीनेच पुढे सरकताना दिसते. विकसित राज्यातील जनतेच्या आकांक्षाही विकसितच असतात! त्या आकांक्षांना पुरं पडण्यासाठी करावी लागणारी गुंतवणूक, नावीन्यपूर्ण कल्पनांचे प्रयोग राबवण्यासाठी घ्यावी लागणारी जोखीम सोपी नसते. राज्य प्रगतीच्या वरच्या टप्प्यावर पोहोचल्यानंतर राज्यकर्त्यांसमोर उभी राहणारी आव्हानंही त्याच उंचीची असतात. कालच्या अर्थसंकल्पात या आव्हानांची जाणीव पदोपदी दिसते आहे. देशातलं प्रगत राज्य शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्येही गेली काही वर्षं आघाडीवर आहे. परस्परविरोधी; पण हे सत्य आहे. हा विरोधाभास संपवण्याच्या दिशेने आणखी एक पाऊल म्हणून या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना जाहीर केलेली कर्जमाफी निश्चितच दिलासादायक ठरू शकते. एकूण कर्जातला दोन लाखांचा वाटा सरकारने उचलला, तरी बऱ्याच शेतकऱ्यांना त्यातून पुढच्या प्रयत्नांसाठी दिलासा मिळू शकतो. अशी कर्जमाफी यापूर्वी झाली नाही, असं नाही. त्या प्रत्येक वेळी तात्कालिक दिलासाही मिळाला. तो आवश्यक असला, तरी त्याने समस्या संपली नाही. पशुपालन, मत्स्यव्यवसायाची जोड हेच शेतीतल्या समस्यांना अधिक शाश्वत उत्तर आहे. 'प्राकृतिक शेती अभियान', 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजक योजना', आणि 'मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजना' समस्येवरचा दीर्घकालीन आणि शाश्वत उपाय ठरू शकतात. महाराष्ट्राच्या कृषी अर्थव्यवस्थेसाठी आवश्यक वीज, पाणी आणि अर्थ पुरवठा या तिन्हींचाही अर्थसंकल्पात साकल्याने केलेला विचार ग्रामीण महाराष्ट्रात नवचैतन्य आणल्याशिवाय राहणार नाही. परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यात महाराष्ट्र हे देशातलं पहिल्या क्रमांकाचं राज्य आहे. हल्ली असा एकही आठवडा जात नाही, जेव्हा कोणत्या ना कोणत्या राष्ट्राचा प्रमुख किंवा औद्योगिक शिष्टमंडळ मुंबई भेटीवर नसतं. फडणवीस यांनी या आघाडीवर राज्याची आघाडी कायम ठेवली आहेच; पण अशा गुंतवणूकदारांना अधिकाधिक संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी पायाभूत विकासासाठी केलेल्या तरतुदी अधिक आश्वासक आहेत. राज्यात आठ ते दहा 'एज्युसिटी' विकसित करण्याची, महामुंबईत नवी झोपडी उभी राहू नये यासाठी 'नो न्यू स्लम फ्रेमवर्क', मुंबई आणि परिसरातील वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून भुयारी मार्गांचं जाळं, समृद्धी महामार्गाला मालवाहतूक कॉरिडॉरची जोड, 'महाराष्ट्र आरोग्य सार्वजनिक संस्थे'ची स्थापना किंवा कर्करोग, मधुमेह, हृदयरुग्णांच्या निदानासाठी ग्रामीण महाराष्ट्रात ४ हजार ५०० कोटी रुपयांचा निधी ह्या या अर्थसंकल्पातील विचारांची खोली दर्शवणाऱ्या बाबी आहेत. राज्याच्या विकासाच्या अंगोपांगांचा विचार करून काळाची पावलं आणि गती ओळखून तयार केलेला हा अर्थसंकल्प म्हणूनच कौतुकास्पद आहे. महात्मा फुले यांचं २०० वं जयंती वर्ष आणि संत गाडगेबाबांचं १५०वं जयंती वर्ष साधून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मरणासह हे वर्ष 'सामाजिक समता आणि समरसता वर्ष' म्हणून साजरं करण्याची कल्पना मांडून महायुतीने आपल्या सर्वसमावेशक विकासरथावर सामाजिक न्यायाचं जे निशाण फडकावलं आहे, ते सर्वार्थसूचक आहे!

# नाथांच्या घरची उलटी खूण

श्री संत एकनाथ महाराज हे श्री संत भानुदास महाराज यांचे पणतू होय. श्री भानुदास-चक्रपाणी-सूर्यनारायण-श्री एकनाथ महाराज अशी परंपरा आहे. मूळ नक्षत्रावर जन्म असल्याने बालपणीच आईवडील निवर्तले, असे महाराजांचे स्वतःचे म्हणणे आहे. 'मुळीच्या मुळी' या अभंगातून ते बोलतात. महाराजांचं घराणं अतिशय पवित्र असून, परंपरेने विठ्ठलभक्ती या घराण्यात केली जाते. विजयनगरचा राजा कृष्णदेवराय याने श्री विठ्ठलाची मूर्ती पंढरपूरहून आपल्या राजधानीत नेली होती. ती पुन्हा श्री संत भानुदास महाराज यांनी परत आणली. अर्थात, श्री विठ्ठलप्रेम हे परंपरेत मुरलेले आहे. तसे पाहिले तर सुर्यनारायनाची उपासना करणारे हे घर आहे; परंतु ओढा मात्र श्री विठ्ठल भक्तीकडे असल्याचे जाणवते.

नाथ महाराजांचे गुरु हे श्री संत जनार्दन स्वामी होय. इ.स.१५०४ ते १५७५ हा स्वामींचा काळ होय. स्वामींचा जन्म फाल्गुन वद्य षष्ठीचा मानला जातो. स्वामींचा अनुग्रह व समाधी याच दिवशी मानली जाते. षष्ठीचा उत्सव नाथ महाराज यांनीच सुरु केला आणि याच दिवशी नाथ महाराज गंगार्पण झाले. नाथ महाराजांचा काळ इ.स.१५३३ ते १५९९ असा मानला जातो. नाथ त्यांच्या लिखाणातून दिसते. टिपऱ्या, विटी-दांडू, लपंडाव, हमामा, हुतूतू इत्यादी खेळांचे अध्यात्मिक रुपक करुन त्यांनी लोकांना परमार्थाचं ज्ञान दिलं. महाराष्ट्रात नाथांनी भारुडाला प्रसिद्धी दिली. अध्यात्मिक क्षेत्रात मनोरंजनाचं वावडं नाही, हे महाराजांनी आपल्या भारुड व कूट या प्रकरणातून दाखवून दिले. 'भावार्थ रामायण' ही नाथ महाराजांची अखेरची रचना होय. बाल, अयोध्या, अरण्य, किष्किंधा, सुंदर हे पाच कांड लिहिल्यानंतर युद्धकांडाचे ४४ अध्याय त्यांनी लिहिले. त्यांचे शिष्य श्री गावबा महाराज यांनी उर्वरीत 'भावार्थ रामायण' पूर्ण




केले. नाथ महाराजांची अभंगरचना तर अपूर्व आहे. सर्व जाती-जमातीवर त्यांची रचना आहे. शिवाय सर्प, विंचू, मरीआई, सटवाई, वाघ्या, जोहार आदी रचना अधिक लोकप्रिय आहेत. जमा-खर्च, ताकीदपत्र, कौलपत्र, अर्ज, अर्जदस्त इत्यादी छंदरहित; पण आशययुक्त रचनाही आहेत. केवळ बाहेरून जो चांगला दिसतो, तो आतून मात्र भयंकर विषारी असतो. तोच समाजाला खरा घातक असतो. ही जमात आध्यात्मिक क्षेत्रात विशेषकरून आढळते. ईश्वराचा साक्षात्कार नसताना स्वतःलाच ते ईश्वर मानतात. स्वतः संत नसतानाही इतरांना ते शिष्य बनवितात. याची चीड नाथ महाराजांच्या लेखणीला येते. सामान्यांना संत समजणं हे जरा अवघड आहे. बाहेर पाहणारे डोळे आतलं जाणण्यास असमर्थ असतात. सांसारिक माणसं बाहेरून सजतात. संत आतून सजलेला असतो.



न्यायाचार्य नामदेव शास्त्री महाराज

नाथ महाराजांच्या जीवनात गुरू आणि घराणं हे दोन्ही श्रेष्ठ आहेत. देवाला आणणारे पणजोबा आहेत, तर देव दाखविणारे श्रीगुरू आहेत. शिवाय माऊलींचाही वरदहस्त आहे. ही अध्यात्मातील त्रिवेणीच आहे, ज्यात नाथ महाराज विनासायास संतत्वाला प्राप्त झाले. संत देवप्रिय असल्याने कायमस्वरूपी ते लोकप्रिय असतात. भगवंताच्या आशीर्वादाने त्यांना कीर्ती लाभलेली असते. नीतिपूर्वक, त्यागपूर्वक जीवन असल्याने नाथांना यवन सुद्धा क्रोध आणू शकला नाही. तरीपण संतांवर रागावणारे अनेक अज्ञानी, शब्दज्ञानी, अनुभवहीन लोक आहेत.

संकलन-मल्हारी नागरे,
श्री क्षेत्र भगवानगड,
मो.९७२५५६१००८

## युवकांनी आई-वडिलांच्या कष्टाचे चीज केले पाहिजे-वाकसे

बीड दि.८(प्रतिनिधी):- सध्याचे युगामध्ये नोकरी लागणे फार कठीण झाले असून आई-वडिलांनी मेहनत आणि कष्ट करून स्वतःच्या मुलांना शिक्षणामध्ये प्रभावित केले की यश संपादित करता येते युवकांनी जिद्द चिकाटी मेहनत घेतली पाहिजे या मेहनतीच्या जोरावर आणि आई-वडिलांच्या कष्टाची चीज निश्चितपणे करता येते. असे मत मल्हार ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष दत्ता वाकसे यांनी व्यक्त केले. वडवणी तालुक्यातील पुसरा येथील मेंढपाळ धनगर समाजातील महादेव केशव बिटे यांची भारतीय सैन्य अंतर्गत कार्यरत असलेल्या प्रदेशिक सेना आर्मी अंतर्गत निवड झाल्याबद्दल मल्हार ब्रिगेड च्या वतीने भव्य सत्कार पिवळी शाल पुष्पगुच्छ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला पुढे बोलताना वाकसे म्हणाले की धनगर समाज हा अतिशय कष्टाळू आणि मेहनती समाज असून मेंढपाळ व्यवसाय त्याचबरोबर शेती करत स्वतःच्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहामध्ये अन्य काळाची गरज असून शिक्षणाशिवाय कुटुंबाची घराची प्रगती होऊ शकत नाही त्याचबरोबर बाबासाहेबांनी मूलमंत्र दिलेला आहे की चिका संघटित व्हा आणि संघर्ष करा मूलमंत्र मनाशी घट्ट बांधून विद्यार्थ्यांनी यश संपादित केले पाहिजे.

## आजपासून लवूळ येथे अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ

लवुळ दि.८(प्रतिनिधी):- माजलगाव तालुक्यातील लवूळ क्रमांक १ येथे दरवर्षीप्रमाणे एकनाथषष्ठी निमित्त अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ झाला असून, यामध्ये रोज काकडा भजन, विष्णुसहस्त्रनाम, ७ ते १० ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी २ ते ५ शिव महापुराणकथा, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ आणि त्यानंतर ८ ते १० हरीकिर्तन होऊन त्यानंतर जागर होईल. सोमवार दि.९ मार्च रोजी गाथामूर्ती तुकाराम महाराज घांडगे आळंदी, मंगळवार १० मार्च रोजी रामायणाचार्य भागवत महाराज नखाते परभणी, बुधवार दि.११ मार्च रोजी भागवताचार्य सुरेश महाराज लांडे आळंदी, गुरुवार दि.१२ मार्च रोजी भागवताचार्य शंकर महाराज चिंचकर बीड, शुक्रवार दि.१३ मार्च रोजी ज्ञानेश्वरी कंठभूषण बाबा महाराज राऊत आळंदी, शनिवार दि.१४ मार्च रोजी विनोदाचार्य उत्तरेश्वर महाराज जाधव वांगीकर, रविवार दि.१५ मार्च रोजी युवा प्रेरक अक्षय महाराज पिंगळे व त्यानंतर सोमवार दि.१६ मार्च २०२६ रोजी श्री. ह. भ. प. विनोदाचार्य दीपक महाराज बादाडे यांचे काल्याचे किर्तन होईल व त्यानंतर महाप्रसाद होईल. या सप्ताहाचे मार्गदर्शक श्री. ह. भ. प. ज्ञानेश्वर महाराज भगत, शिवमहापुराण कथा प्रवक्ते अंगद महाराज डाके गुरुजी माजलगावकर तर ज्ञानेश्वरी पारायण नेतृत्व श्री. ह. भ. प. विठ्ठल महाराज अंबुरे हे आहेत. स्थळ संत ज्ञानेश्वर माऊली मंदिर लवूळ क्रमांक १ तालुका माजलगाव जिल्हा बीड येथे होत असून जास्तीत जास्त पंचक्रोशीतील भाविक मंडळांनी याचा लाभ घ्यावा, असे आव्हान येथील सर्व ग्रामस्थांनी व तरुण पिढीने केलेले आहे.

# गेवराई तालुक्यातील जलसंधारणाचा आराखडा तयार होण्यासाठी ड्रोनच्या माध्यमातून सर्व्हे करावा - उध्दव मडके



गेवराई दि.८ (प्रतिनिधी) - मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गेवराई तालुक्यात पाणलोट क्षेत्राचा ड्रोन सर्व्हे करून वैज्ञानिक पद्धतीने संपूर्ण जलसंधारण आराखडा (मास्टर प्लॅन) तयार करण्यात यावा, तसेच तालुक्यात मोठ्या प्रमाणावर जलसंधारणाची कामे राबविण्यात यावीत अशी मागणी शिवसेना तालुकाप्रमुख उद्धव बापू मडके यांनी महाराष्ट्र राज्याचे मृदा व जलसंधारण मंत्री ना.संजयभाऊ राठोड यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. श्री संत सेवालाल महाराज जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर गेवराई येथे मंत्री संजयभाऊ राठोड यांचा शिवसैनिक व युवा सेना कार्यकर्त्यांच्या वतीने भव्यदिव्य सत्कार करण्यात आला. त्यानंतर शिवसेना तालुकाप्रमुख उद्धव बापू मडके यांनी गेवराई तालुक्यातील जलसंधारणाच्या विविध प्रश्नांबाबत सविस्तर निवेदन मंत्री महोदयांना सादर केले. या निवेदनात गेवराई तालुक्याला विशेष जलसंवर्धन तालुका घोषित करणे, पाणलोट क्षेत्राचा ड्रोन सर्व्हे करून वैज्ञानिक पद्धतीने जलसंधारणाचा मास्टर प्लॅन तयार करणे, तालुक्यात १०० पेक्षा अधिक सिमेंट नाला बांध (उछइ) व कोल्हापुरी बंधारे मंजूर करणे, शेतकऱ्यांसाठी १०० टक्के अनुदानावर शेततळे योजना राबविणे तसेच गाळमुक्त धरण - गाळयुक्त शिवार अभियान प्रभावीपणे राबविणे या महत्त्वाच्या मागण्या करण्यात आल्या. ड्रोन सर्व्हेच्या माध्यमातून गेवराई तालुक्याचा संपूर्ण जलसंधारण आराखडा तयार झाल्यास पावसाच्या पाण्याचे नियोजन वैज्ञानिक पद्धतीने होऊन भविष्यात तालुक्यात जलसंधारणाची मोठी क्रांती घडू शकते असे मत शिवसेना तालुकाप्रमुख उद्धव बापू मडके यांनी व्यक्त केले. यावेळी मंत्री ना.संजयभाऊ राठोड यांनी निवेदनाची दखल घेत जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य देत या विषयावर सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. याप्रसंगी युवा सेना मराठवाडा निरीक्षक अविनाश भाऊ जाधव, युवासेना जिल्हाप्रमुख सुमित भैय्या कोळपे, जगदीश राठोड वैद्यकीय जिल्हाप्रमुख महादेव मतकर, युवासेना तालुका अध्यक्ष बिबीशन मोघे, लिंबाजी मामा जाधव, विलास मस्के, प्रसाद चव्हाण, कृष्णा जाधव यांच्यासह अनेक शिवसैनिक उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानात सामान्य जनता 'अ' समाधानी

गेवराई दि.८ (प्रतिनिधी) - महाराष्ट्र शासनाने हाती घेतलेले छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानाचा शुभारंभ शनिवारी तलवाडा जि.प.मा.शाळा तलवाड्यातून करण्यात आला तर या शिबीराच्या नियोजनशुन्यते मुळे महसूल विभागाच्या वतीने शिबिरात राबवण्यात येणाऱ्या सुविधा सामान्य माणसांना मिळाल्या नाहीत. तसेच याठिकाणी आजी-माजी पदाधिकाऱ्यांना डावलण्यात आल्याने या कार्यक्रमात विसंगती दिसून आली. मंडळ अधिकारी बाबा बडे यांनी योग्य नियोजन न केल्यामुळे या समाधान शिबिरात सामान्य जनतेला अ समाधानी रहावे लागल्याचे चित्र याठिकाणी दिसून आले.महाराष्ट्र शासनाच्या वतीने सामान्य जनता, शेतकरी यांच्या सुखसोयी साठी गेवराई तालुक्यातील तलवाडा याठिकाणी जिल्हा परिषद शाळेत महाराजस्व समाधान शिबीर आयोजित करण्यात आले होते.यामध्ये प्रामुख्याने पारधी समाजाला जातीचे प्रमाणपत्र वाटप करणे, अभिलेखे दुरुस्त करणे, विवादग्रस्त प्रकरणे निकाली काढून आदेश पारित करणे, फेरफार अदालत घेऊन सात बारा वितरित करणे, मंडळ अधिकारी कार्यालय बळकटीकरण करणे यासह सामान्य जनतेशी निगडीत अनेक विषय या शिबिरात घेण्यात आले होते. परंतु मंडळ अधिकारी यांच्या नियोजनशून्य कार्यक्रमामुळे काही ठराविक प्रमाणपत्रे वाटप करण्याव्यतिरिक्त जे काही कार्यक्रम पत्रिकेत विषय ठेवण्यात आले होते त्यांना बगल देण्याचे काम याठिकाणी झाल्याने सामान्य जनतेला याचा काही फायदा झाला नसल्याच्या प्रतिक्रिया अनेकांनी बोलून दाखवल्या. आ.विजयसिंह पंडित यांनी या अभियानाचा मुख्य हेतू व शासनाच्या इतर विविध योजना शेतकरी, शेतमजूर व सामान्य जनता यांच्यासाठी किती उपयुक्त आहेत हे समजावून सांगितले.

# डॉ.आदिती सारडा फिनिक्स महिला प्रेरणा पुरस्काराच्या योग्य मानकरी-संतोष मानूरकर

बीड दि ८(प्रतिनिधी)-आदित्य शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रामध्ये डॉ. आदिती सुभाष सारडा यांचे काम निश्चितच कौतुकास्पद आहे. बीड जिल्ह्याचे सर्वांगीण वैभव वाढवण्यामध्ये सारडा परिवाराचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याने आज जागतिक महिला दिनी डॉ. आदिती सारडा यांना पत्रकार संघाच्या वतीने दिलेला फिनिक्स महिला प्रेरणा पुरस्कार योग्य आणि कौतुकास्पद आहे असे स्पष्टमत ज्येष्ठ पत्रकार संतोष मानूरकर यांनी व्यक्त केले. तर स्त्री ही केवळ कुटुंबाची नव्हे तर संपूर्ण समाजाच्या प्रगतीची शक्ती आहे. तिचा सन्मान आणि समानता हीच खऱ्या प्रगतीची गुरुकिल्ली आहे. जर महिलांच्या हातात सत्ता म्हणजेच प्रशासन असेल तर सुशासन निर्माण होते, एक चांगली शिस्त लागते हे मी आदित्य ग्रुपच्या माध्यमातून आपल्या सगळ्यांच्या आशीर्वादामुळे करू शकले. असा विश्वास सत्कारमूर्ती डॉक्टर आदिती सारडा यांनी सत्काराला उत्तर देताना व्यक्त केला.जागतिक महिला दिनानिमित्त रविवार दिनांक ८ मार्च रोजी बीड येथील जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई आणि दैनिक समर्थ राजयोगच्या वतीने सामाजिक जाणीव ठेवणाऱ्या उपक्रमाने जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. बेघर निवारा केंद्रातील पुनर्वसित झालेल्या ६ महिलांना प्रमुख अतिथी डॉ. आदिती सुभाषचंद्र सारडा यांच्या शुभहस्ते साडीचोळी, सन्मानपत्र आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.त्याचबरोबर पत्रकार संघाच्या वतीने देण्यात येणारा सन्मानाचा फिनिक्स महिला प्रेरणा पुरस्कार २०२६



हा डॉ. आदिती सुभाषचंद्र सारडा यांना ज्येष्ठ पत्रकार संतोष मानूरकर आणि कार्यक्रमाचे आयोजक पत्रकार वैभव विवेक स्वामी, पत्रकार शेख आयेशा, सामाजिक कार्यकर्त्या सौ मनिषा स्वामी, काळजीवाहक छाया सरोदे तसेच उपस्थित सर्व मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानपत्र, पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ देऊन शानदार गुणगौरव करण्यात आला.यावेळी जिव्हाळा बेघर निवारा केंद्रातील प्रत्येक लाभार्थ्यांच्या व्यथा ऐकून संवेदनशील झालेल्या सत्कारमूर्ती डॉ. आदिती सारडा यांनी भावनिक होऊन आपले अनमोल असे विस्तृत मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिव्हाळा बेघर केंद्राचे संचालक राजू वैद्य यांनी सविस्तरपणे केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पत्रकार वैभव स्वामी यांनी पुढाकार घेतला. दरम्यान शैक्षणिक आणि सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई आणि दैनिक समर्थ राजयोग यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. आदिती सारडा यांना यावर्षीचा फिनिक्स महिला प्रेरणा पुरस्कार २०२६ प्रदान करण्यात आला.

## उमापुर येथे आदर्श शिक्षक सुभाष काळे यांच्या वतीने पाणपोईचे उद्घाटन

उमापुर दि ८ (प्रतिनिधी)- समाजसेवक तथा आदर्श शिक्षक सुभाष काळे हे गेल्या तेरा वर्षांपासून गेवराई तालुक्यातील उमापुर येथे उन्हाळयामध्ये पाणपोई व शंभर पाणओठे अविरतपणे चालवतात. या पाणपोई व शंभर पाणओठ्याचे उद्घाटन दि. ८ मार्च रोजी हभप रघुनाथ निंबाळकर, सर्पराज्ञीचे सिद्धार्थ सोनवणे, गलाब भोले, दत्ता प्रभाळे, आदर्श शिक्षक धर्मराज करपे, राजेंद्र भोलेसह गावातील नागरिकांच्या उपस्थिती उद्घाटन करण्यात आले.

गेवराई तालुक्यातील उमापुर हे अत्यंत महत्वाचे गाव असून या ठिकाणी सूभाष काळे हे कायम समाजसेवा करत असतात. गेल्या तेरा वर्षापासून राबवत आहेत याचा



मनस्वी अभिमान वाटत असल्याचे मत सिद्धार्थ सोनवणे यांनी व्यक्त केले. यावेळी कार्यक्रम यशस्वीते साठी सरपंच किरण आहेर, रावसाहेब काळे, जयदीप औटी, महादेव औटी, रावसाहेब देशमुख, राजीव पोकळे, कृष्णा सामसे, फादर कापसे, अमोल राजे देशमुख कैलास तांबे, बप्पासाहेब काकडे, दादा पोकळे, श्याम पोकळे, श्याम वाघमारे सर, महेश काकडे, ओम प्रकाश राऊत, रवींद्र काळे गावातील सर्वच मान्यवर यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक माऊली पिंगळे यांनी करून पशु पक्षांना पाणवटे देण्यासंदर्भात सविस्तर माहिती दत्ता चौरे यांनी दिली. कार्यक्रमाचे आभार संघर्ष धान्य बँकेचे संचालक, आदर्श शिक्षक धर्मराज करपे यांनी मानले

# महिला दिनानिमित्त क्रीडा क्षेत्रातील गुणवंत महिलांचा सत्कार करून केला सन्मान

बीड दि ८(प्रतिनिधी)-- क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त जिल्ह्यातील गुणवंत राष्ट्रीय खेळाडू व महिला प्रशिक्षकांचा सन्मान करण्यात आला, अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी दिली. जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे रविवार दिनांक ८ मार्च २०२६ रोजी जागतिक महिला दिनानिमित्त क्रीडा क्षेत्रातील गुणवंत महिलांच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी शिवछत्रपती पुरस्काराने सन्मानित प्रा. जे .पी . शेळके , तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र राज्य संघटनेचे अध्यक्ष डॉ. अविनाश बारगजे, ज्येष्ठ क्रीडा संघटक प्रा. दिनकर थोरात , जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर , जिल्हा रग्बी संघटनेचे सचिव नितीन येळवे , राष्ट्रीय रग्बी प्रशिक्षक शोयब खाटीक , जिल्हा क्रीडा पुरस्कार प्राप्त क्रीडा संघटक शरद अंदुरे, जिल्हा क्रीडा पुरस्कार प्राप्त महिला तायक्वांदो प्रशिक्षिका जया बारगजे, योग प्रशिक्षिका राधा तांबे , क्रीडा मार्गदर्शक श्री रेवन्नाथ शेलार ,अविनाश पाटील, क्रीडा अधिकारी अनिकेत काळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी करून या कार्यक्रमाचे महत्त्व व जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्रातील प्रगती बद्दल माहिती दिली . डॉ. अविनाश बारगजे यांनी यावेळी मनोगत व्यक्त करताना बीड जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्रातील योगदानाबद्दल सर्व महिला खेळाडू प्रशिक्षकांचे कौतुक केले. प्रा.जे पी शेळके यांनी अध्यक्षीय समारोपप्रसंगी बोलताना सांगितले की, महिलांना क्रीडा क्षेत्रात मोठ्या संधी उपलब्ध असून मुलींनी आंतरराष्ट्रीय पातळीवर पदक जिंकण्याचे ध्येय मनाशी बाळगून बीड जिल्ह्याचे नाव लौकीक वाढवावे असे आवाहन केले. यावेळी गुणवंत क्रीडा कार्यकर्ता जिल्हा क्रीडा पुरस्कार विजेत्या तायक्वांदो प्रशिक्षिका जया बारगजे, योग प्रशिक्षिका राधिका तांबे व राष्ट्रीय पातळीवरील उल्लेखनीय कामगिरी केलेल्या तायक्वांदो खेळाची आंतरराष्ट्रीय खेळाडू नयन बारगजे , राष्ट्रीय पदक विजेती तायक्वांदो खेळाडू कार्तिकी मिसाळ , यशश्री चव्हाण , राष्ट्रीय बेसबॉल खेळाडू रत्नमाला चौरे , आकांक्षा खरब , राष्ट्रीय रग्बी खेळाडू आदिती लोंढे, कीर्ती जाधव व राधा दिवे या गुणवंत महिला खेळाडूंचा प्रातिनिधिक स्वरूपामध्ये सन्मानचिन्ह व



गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन ज्ञानेश्वर कोठूळे यांनी केले तर आभार प्रदर्शन क्रीडा मार्गदर्शक रेवणनाथ शेलार यांनी केले.

# हायवे रोडवर दरोडा टाकणाऱ्या टोळीवर मिनी मकोका

## पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांची धडक करवाई



**बीड दि ८(प्रतिनिधी)– जिल्ह्यातील वाढत्या चोरी, घरफोडी आणि दरोड्याच्या घटनांवर आळा घालण्यासाठी बीड जिल्हा पोलीस प्रशासनाने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी कार्यभार स्वीकारल्यानंतर गंभीर गुन्हे करणाऱ्या टोळ्यांवर विशेष लक्ष ठेवण्याचे निर्देश दिले आहेत.याच अनुषंगाने हायवे रोडवर दरोडा टाकणाऱ्या टोळीवर भारतीय न्याय संहिता (इछड) कलम १११ अंतर्गत संघटित गुन्हेगारी अर्थात मिनी मकोका लागू करण्यात आला आहे.**

दि. ४डिसेंबर २०२५ रोजी फिर्यादी शिवप्रसाद किशोरकुमार पौने (वय ३२, रा. कल्पना सोसायटी, गणेशनगर, खुदबुल्लापूर, जि. रंगारेड्डी, तेलंगणा) यांनी गेवराई पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, ते कुटुंबासह खासगी कारने शिर्डीकडे दर्शनासाठी जात असताना रात्री सुमारे १२.३० वाजता शिवशारदा शाळेजवळ गाडी थांबवली. त्यावेळी चार अज्ञात आरोपींनी गाडीची चावी काढून गाडीचे नुकसान केले आणि लोखंडी रॉडने मारहाण करत धमकावून सुमारे ३ लाख ४६ हजार रुपये किमतीचे सोन्या–चांदीचे दागिने जबरदस्तीने लुटून नेले.या घटनेचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अण्णासाहेब पवार करत आहेत. तपासादरम्यान या गुन्ह्यात एकूण सहा आरोपींचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले असून त्यापैकी तीन आरोपींना अटक करण्यात पोलीसांना यश आले आहे. या गुन्ह्यामध्ये १) राहुल अनिल काळे (वय १९),२)विकास अनिल काळे (वय २१), ३) अनिल रामा काळे (वय ४०)(सर्व रा. खामकरवाडी, ता. वाशी, जि. धाराशिवया तिघांना दि. १२ डिसेंबर २०२५ रोजी अटक करण्यात आली. पोलीस कोठडीदरम्यान त्यांच्या ताब्यातून ४ लाख २९ हजार रुपयांचे सोन्या–चांदीचे दागिने व रोख रक्कम जप्त करण्यात आली. तसेच गुन्ह्यात वापरलेली सुमारे १० लाख रुपये किंमतीची हेक्टर चारचाकी गाडीही जप्त करण्यात आली आहे. या गुन्ह्यातील इतर तीन आरोपी सध्या फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. तपासात असेही निष्पन्न झाले की, या टोळीच्या प्रमुखाने संघटित पद्धतीने टोळी तयार करून बीड जिल्ह्यात पाच गंभीर गुन्हे केले आहेत. शस्त्रांचा धाक दाखवून आर्थिक फायद्यासाठी हे गुन्हे केल्याचे स्पष्ट झाल्याने पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी पोलीस ठाणे गेवराई गुन्हा क्रमांक ७१४/२०२५ मध्ये भारतीय न्याय संहिता कलम ३०९(६), ३१०(२), ३२४(४) सोबतच कलम १११ (संघटित गुन्हेगारी – मिनी चउजउअ) लागू करण्यास परवानगी दिली.ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके आणि पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या कारवाईत पो.नि. किशोर पवार, सपोनि अण्णासाहेब पवार, पोलीस कर्मचारी कल्याण राठोड, कांबळे तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे अभिमन्यू औताडे, बिबीषण चव्हाण आणि शेख अलीम यांचा सहभाग होता.दरम्यान, भविष्यातही अशा संघटित गुन्हेगारी टोळ्यांवर मोक्का किंवा मिनी मोक्का सारखी कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी दिला आहे.

## पंचायत समिती बीड येथे

# जागतिक महिला दिन उत्साहात साजरा



बीड दि ८ (प्रतिनिधी) – पंचायत समिती बीड येथे रविवार रोजी जागतिक महिला दिनानिमित्त छोटेखानी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून तसेच दीपप्रज्वलन करून करण्यात आली.

या कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नर्सेस संघटनेच्या अध्यक्षा श्रीमती आशा दुधमल यांनी केले. तसेच श्रीमती काळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामुदायिक आरोग्य अधिकारी, उपकेंद्र पेंडगाव येथील श्रीमती ज्योती सूर्यवंशी या होत्या. त्यांनी उपस्थित सर्व महिलांना महिला दिनाच्या शुभेच्छा देत आपले अनमोल विचार मांडले. यावेळी त्यांनी ''सहजयोग – आजचा महायोग'' या विषयाबाबतही माहिती दिली.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मंत्रालयीन अधिकारी कर्मचारी संघटना मुंबई तसेच महाराष्ट्र कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ (आरोग्य विभाग) मराठवाडा अध्यक्ष श्री नितीन महुवाले उपस्थित होते. याशिवाय श्रीमती सुनंदा वाघमारे, श्रीमती अंजु मैंद, श्रीमती संजवणी काळे, श्रीमती के. एस. जोशी, श्रीमती मिना गवळी, श्रीमती कुलथे, श्रीमती कवडे, श्रीमती बर्डे, श्रीमती बामने, श्रीमती उडाळे, श्रीमती काळे आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाच्या शेवटी श्रीमती सुनंदा वाघमारे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# राज्याच्या अर्थसंकल्पात दिव्यांगांसाठी ठोस तरतूद नसल्याने नाराजी–जिलानी शेख

पाटोदा (प्रतिनिधी) : राज्य सरकारने सादर केलेल्या चालू वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये दिव्यांग व्यक्तींसाठी ठोस व विशेष तरतूद करण्यात आलेली नसल्याने दिव्यांग बांधवांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. दिव्यांगांच्या शिक्षण, रोजगार, आरोग्य व स्वावलंबनासाठी अपेक्षित असलेल्या योजनांबाबत अर्थसंकल्पात स्पष्ट घोषणा नसल्याचे मत व्यक्त होत आहे.दिव्यांग संघर्ष समिती महाराष्ट्राचे जिलानी शेख यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे याबाबत प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. त्यांनी म्हटले आहे की, ''अर्थसंकल्प हा सर्व समाजघटकांचा असतो; परंतु दिव्यांग व्यक्तींसाठी ठोस तरतूद नसणे ही त्यांच्या हक्कांची उपेक्षा आहे.''

राज्यातील अनेक दिव्यांग व्यक्तींना आजही मूलभूत सुविधा मिळण्यात अडचणी येत आहेत. शासनाच्या परिपत्रकानुसार दिव्यांग व्यक्तींना व्यवसायासाठी २०० चौरस फूट जागा उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे, मात्र प्रत्यक्षात अनेक ठिकाणी या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अनेक दिव्यांग नागरिकांना स्वतःचा छोटा व्यवसाय सुरू करण्यासाठी जागेचा मोठा अडथळा निर्माण होत असल्याने शासनाने या निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांकडून दिव्यांग कल्याणासाठी ५ टक्के निधी खर्च करण्याचा नियम असला तरी तो निधी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मर्यादित उत्पन्नातून न देता शासनाने ग्रामपंचायत, नगरपंचायत व पंचायत समितींना दिलेल्या निधीतून स्वतंत्रपणे उपलब्ध करून द्यावा, अशी मागणीही करण्यात आली आहे. यामुळे दिव्यांग व्यक्तींसाठी विविध योजना आणि सुविधा प्रभावीपणे राबविता येतील, असे मत व्यक्त करण्यात आले.याशिवाय दिव्यांग व्यक्तींसाठी संजय गांधी निराधार योजनेचे मानधन वाढविणे, दिव्यांगांसाठी स्वतंत्र घरकुल योजना सुरू करणे, स्वयंरोजगारासाठी बिनव्याजी कर्ज योजना, ई–रिक्षा व इलेक्ट्रिक सायकल उपलब्ध करून देणे, कौशल्य विकास प्रशिक्षण, मोफत आरोग्य सेवा, कृत्रिम अवयव व सहाय्यक साधने उपलब्ध करून देणे, तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विशेष शिष्यवृत्ती अशा विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.वैभव देशमुख, अशोक दगडखैर, बजरंग लांडगे, ईश्वर आमटे, पोपट पोकळे, हनुमंत काळुसे, संतोष राख, ईश्वर माने, दत्ता कदम, संदिपान नागरगोजे, शेख नदीम, सय्यद मतीन, महादेव तांबारे, संतोष मकाळ इत्यादींनी ही मागणी केली आहे.

# महिलांनी राजकारण बदलायला राजकारणात यावे : भीम रासकर

**महिला सक्षमीकरणाचा संदेश देणारा माजलगाव विकास प्रतिष्ठानचा महिला मेळावा उत्साहात**




माजलगाव (प्रतिनिधी): महिलांनी समाजातील बदल घडवण्यासाठी राजकारणात सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. राजकारण बदलायचे असेल तर महिलांनी स्वतः राजकारणात उतरले पाहिजे, असे प्रतिपादन महिला राजसत्ता आंदोलनाचे भीम रासकर यांनी केले. ते माजलगाव विकास प्रतिष्ठानतर्फे आयोजित महिला मेळाव्यात बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंगलाताई सोळंके या होत्या. कार्यक्रमाची सुरुवात ''आम्ही घासून ठेवली ग्रामसभेची तलवार'' या प्रेरणादायी गीताने झाली. रेखा होके यांच्या मार्गदर्शनाखाली सिंदफणा पब्लिक स्कूलच्या विद्यार्थिनींनी उत्कृष्ट नृत्य सादरीकरण केले. तसेच सखाराम जोशी आणि प्रवीण मडके यांच्या दिग्दर्शनाखाली सामाजिक आशयाचे पथनाट्य ''लढा महिला राजसत्तेचा'' शाळेच्या शिक्षिकांनी सादर केली. माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या सचिव नीला देशमुख यांनी प्रास्ताविकातून संस्थेच्या कार्याचा आढावा मांडला. ॲड. पल्लवी सोळंके यांनी शक्ती कायदा याबाबत महिलांना सविस्तर माहिती दिली. आपल्या भाषणात भीम रासकर यांनी महिलांना प्रेरणा देताना ''आम्ही सख्या नाही पण पक्क्या बहिणी, सांदी कोपऱ्यात राहायचं नाय, राज्य करायला घाबरायच नाय, अशा घोषणांनी महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला. महिला राजसत्तेसाठी आपण सर्वतोपरी मदत करू असे त्यांनी जाहीर केले. अनेक महिला सरपंचांच्या चातुर्याचे अनुभव सांगत महिलांनी व्यापक राजकारणावरही बोलले पाहिजे, असे त्यांनी सांगितले. प्रत्येक महिलेनं किमान एक सत्ता केंद्र काबीज करण्याचा प्रयत्न करावा, ग्रामपंचायतीचे काम प्रत्यक्ष पाहावे आणि विरोधकांशी संवाद साधायला शिकावे, असेही त्यांनी नमूद केले. महिलांच्या चारित्र्यावर अनेकदा हल्ले केले जातात, मात्र अशा वेळी खंबीरपणे उभे राहणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. समाजातील स्वावलंबी महिलांचा सत्कार व्हावा आणि महिलांनी जे जमत नाही तेही करून दाखवावे, असे आवाहन त्यांनी केले. ''महिलांचा खरा दागिना म्हणजे ताठ मान आणि ताठ कणा'' असे प्रभावी प्रतिपादनही त्यांनी केले. कृषी विज्ञान केंद्र, सगरोळीच्या संचालिका डॉ. माधुरी रेवणवार यांनी आपल्या भाषणात ज्ञान आणि विज्ञान यांच्या साहाय्याने सेंद्रिय शेती करणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. शेतीतील उत्कृष्ट कार्याबद्दल ज्ञानगंगा शेतकरी बचत गट तसेच हिरकणी महिला शेतकरी गटाचा सत्कार करण्यात आला.माजलगावच्या नगराध्यक्षा शिफा चाऊस यांनी मनोगत व्यक्त करताना ''मी नगराध्यक्षा असले तरी त्यापूर्वी आई, बहीण आणि सून आहे. त्यामुळे तुमचे दुःख हे माझे दुःख आहे,'' असे भावनिक मत व्यक्त केले.या कार्यक्रमासाठी ॲड. पल्लवी सोळंके, मस्साजोगच्या सरपंच वर्षा सोनवणे, समाजसेवक धनंजय देशमुख, कवी प्रभाकर साळेगावकर, डॉ. जनक चौरे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिंदफणा पब्लिक स्कूलच्या शिक्षिका शालिनी गडाख आणि अनुराधा सोळंके यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. वरुण तौर यांनी मानले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात मंगलाताई सोळंके यांनी माजलगाव विकास प्रतिष्ठान असेच सामाजिक उपक्रम घेत राहील अशी ग्वाही दिली. माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या संघटिका उर्मिला चोपडे, शोभा डाके,प्रभा गंगणे आणि राधा शिंदे यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मेहनत घेतली.

## डॉ.बाबासाहेबआंबेडकर जयंती अध्यक्षपदी शंतनू वडमारे तर सचिव पदी विकास वाघमारे




बीड दि ८ (प्रतिनिधी) – शहरातील कागदीवेस बौद्धनगर, बीड येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त यंदा जयंती उत्सव भव्यदिव्य आणि उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या निमित्ताने विविध सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार असून परिसरात जयंतीचा उत्साह निर्माण झाला आहे.

आयोजक रवी भैय्या वडमारे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यकारिणी निवडण्यात आली.या निवडीमध्ये अध्यक्ष शंतनू वडमारे,सचिव – विकास वडमारे,उपाध्यक्ष – महेश वडमारे,सहसचिव – अविनाश वडमारे,कोषाध्यक्ष शिलवंत वडमारे तसेच समिती सदस्य म्हणून दीपक कांबळे, अमोल वडमारे, विशाल वडमारे, प्रशांत वडमारे, निलेश वडमारे, सिद्धार्थ वडमारे, आकाश वडमारे, राजरत्न वडमारे, राज वडमारे, प्रशांत वडमारे, अतुल गायकवाड, यश वडमारे, सम्राट वडमारे, अर्णव वडमारे आदींचा समावेश आहे.

# बाणाई महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्यावतीने महिलांचा सन्मान



बीड (प्रतिनिधी):– जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून बानाई महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या महिला–भगिनींचा सन्मान आयोजक तथा संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा मीनाक्षी देवकते–डोमाळे यांच्या पुढाकाराने करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून ओबीसी नेत्या सुशीलाताई मोराळे यांच्या हस्ते महिलांना सन्मानित करण्यात आले.

बीड शहरातील सिध्दीविनायक कॉम्प्लेक्स परिसरात असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात झाली. या आगळ्या–वेगळ्या कार्यक्रमात पोलीस हवालदार अशा शिरसाट, नायब तहसीलदार लता शिरसाठ, अंगणवाडी सेविका छाया थोरात, अंगणवाडी सुपरवायझर कावेरी खांडे, बौध्द परिषदेच्या सदस्य मंदाताई मस्के, समाजसेविका कावेरीताई जाधव, रील स्टार कोमल ताई, प्रहार संघटनेच्या जिल्हा अध्यक्ष उजगरे ताई, पोलीस हवलदार अनुराधा गव्हाणे, संभाजी ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्ष कमलताई निंबाळकर, सविता जैन, यांच्यासह विविध क्षेत्रांतील कर्तृत्ववान महिलांचा गौरव करण्यात आला. प्रशासकीय सेवेपासून ते समाजसेवा आणि सोशल मीडियापर्यंत सर्व क्षेत्रांतील महिला भगिनींना प्रमाणपत्र देऊन दिलेला हा सन्मान समाजासाठी प्रेरणादायी असल्याची भावना प्रा.सुशीलाताई मोराळे यांनी यावेळी व्यक्त केली.

### विशेष महिलेचा केला साडी–चोळी देवून गौरव

बीड शहरातील लिंबाबाई कांबळे या विविध शाळेत गोळ्या–बिस्कीटे विकून आपली उपजिवीका भावगतात, शाळेतील मुलांकडे खाऊ घेण्यासाठी जरी पैसे नसले तरी त्या निरागस बालकांना प्रेमाची उब देवून त्याचे तोंड गोड करतात. अशा महिलेचा सन्मान होणे ही भावना बाणाई महिला सेवाभावी बहुउद्देशीय संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा यांनी ओळखली आणि खऱ्या अर्थाने त्यांचा सन्मान होणे महत्वाचे असल्याचे नमुद करुन लिंबाबाई कांबळे यांना संस्थेच्यावतीने साडी–चोळी, संस्थेचे प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले.


## जाहीर प्रगटण

आमचे पक्षकार यांनी दिलेल्या माहीती अधीकार व सुचनेवरूण सर्व जनतेस कळवण्यात येते की, श्री दशरथ बापुराव गुरसाळी रा. वडवणी ता. वडवणी जी. बोड यांचे मालकी व ताब्यात असलेली शिवार वडवणी ता.वडवणी जी. बीड गट नं.४७४ मधील ११.२५ आर (गुंठे )जमीन, लोखंडी व सिमेंटचे कुंपण असलेली ११.२५ आर ( गुंठे) असुन याची चर्तुसिमा खालील प्रमाणे पुर्व – माणिक रुपा पवार, पश्चिम –बांध, दक्षिण –सखाराम रामदास पवार, व उत्तरेस– वडवणी – पाडळसिंगी रस्ता.

वरील वर्णनाची व चर्तुसीमेच्या आतील मिळकत ही आमचे पक्षकार यांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचा ठराव केलेला आहे.ठरावानुसार सदर मालमत्ता हि निर्विवाद बीन बोजा व निरजोखीम हमी व खात्री उपरोक्त जमीनधारक यांनी दिले आहे, तरी सदर मिळकती बाबत व्यव्हाराबाबत कोणासही कसल्याही प्रकारची हरकत जसे की, हक्कसंबंध, चोळीबांगडी, गहाण, तारण, दानपत्र, नोटरी दस्त, बक्षीसपत्र, मृत्युपत्र, मुखत्यारपत्र, इनाम, लेखी अथवा तोडी खरेदीखत, बँक कर्ज, खाजगी कर्ज, न्यायालयीन वाद, शासकीय अथवा निमशासकीय कार्यालयात मिळकत, हस्तांतरण, कायद्यातील कोणत्याही तरतुदीप्रमाणे सदर मिळकतीबाबत व व्यवहाराबाबत हक्क अथवा आक्षेप आसल्यास सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द झाले पासून १५ दिवसाच्या आत नमुद पत्यावर सदर मिळकती बाबतच्या सर्व कागदपत्रासह संपर्क साधावा, मुदतीत कोणाचाही आक्षेप आला नाही तर कोणाचाही आक्षेप नाही असे समजून व ग्राह्य धरुन सदर मिळकती बाबत पुढील खेरदी खताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यांनतर येणारे आक्षेप ग्राह्य धरले जाणार नाहीत.

दिनांक ०८/०३/२०२६
ठिकाण :– वडवणी

जाहिर प्रगटन देणार
**ॲड. एन.आर. लंगडे**
भारत सरकार नोटरी ऑफीस, दिवाणी व फौजदारी न्यायालय
वडवणीच्या शेजारी वडवणी ता. वडवणी जि. बीड
मो.नं : ९८६०९७१८१८



## जाहीर प्रगटण

सर्व जनतेस या जाहिर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, ग्रामपंचायत कार्यालय भाटवडगाव येथील मालमत्ता क्र.१३६/१२६ असा असुन ज्याची साईज ५० बाय ४० फुट अशी असुन जिची चतुसिमा खलील प्रमाणे,

**पुर्वेस :** श्री. प्रदिप जोशी यांचा प्लॉट नं. १२५, **पश्चिमेस :** श्री. सुखदेव बक्षु यांचा प्लॉट नं.१२६, **दक्षिणेस :** २० फुटाचा रस्ता, **उत्तरेस :** सौ. आशाबाई एकनाथराव यांचा प्लॉट नं. १४५

वरील वर्णनाच्या व चतुःसिमेच्या आतील असलेली मालमत्ता ही **श्री. सुधाकर राजाभाऊ देशमाने** यांची असुन सदरील मिळकती हि सुखदेव बक्षु पवार यांना कायम विक्री करण्याचा ठराव केलेला आहे. सदर मिळकत ही निर्वेध व निर्विवाद तसेच बिनबोजा असल्याचे आश्वासन व विश्वास व खात्री उपरोक्त मालकाने दिलेली आहे. या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्ती, संस्था, शासकीय/निमशासकीय कार्यालय अथवा बँक, खाजगी कर्ज इ. चे काही प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष हितसंबंध तसेच इसारपावती, खरेदीखत, गहाणखत, बक्षीसपत्र, दानपत्र, आम मुख्त्यारपत्र, चोळी, बांगडी इ. स्वरुपाचे हक्क संबंध असतील तर संबधीताने हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत योग्य त्या पुराव्यासह खालील पत्यावर आपला आक्षेप नोंदवावा. नमुद मुदतीत कोणाचा काही आक्षेप अथवा उजर आला नाही तर कोणाचाही कसलाही आक्षेप नाही असे गृहीत धरून सदर मिळकतीचे कायमचे खरेदीखत आमचे अशील त्यांच्या हक्कात करुन घेतील व त्यानंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा आक्षेप अथवा उजर ग्रहीत धरला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सबब हे जाहीर प्रगटन.
दिनांक :– ०६/०३/२०२६
ठिकाण :– माजलगाव

जाहीरप्रगटन देणार
**सुखदेव वक्षु पवार**
रा. वारोळा ता. माजलगाव जि. बीड
मो.नं.९००४०३२६४९,
९४२१३३७२९२



क्र.२०२६/संकीर्ण/जन्म–मृत्यु नोंदणी/कावि–कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदारअंबाजोगाई
दि.०६.०३.२०२६

## जाहीरनामा

**जन्म मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत**

**जन्म आणि मृत्युची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ 0 मधील कलम ११ अन्वये**

सर्व जनतेस तालुका अंबाजोगाई यांना जाहिर केले जाते की, अर्जदार गौतम किसन शिंदे रा.घाटनांदूर ता. अंबाजोगाई जि.बीड यांचा मुलगा नामे सौरभ गौतम शिंदे यांचा जन्म दिनांक ०७.१०.२००७ रोजी राहत्या घरी मौजे घाटनांदूर ता. अंबाजोगाई येथे झाला असून अर्जदारांनी जन्माची कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता अर्जदाराचे यांचे कायदेशीर जन्म दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे प्रसिध्दी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहु अर्जदारांचे जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा**
**तहसीलदार, अंबाजोगाई**


## मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्काराने प्रा. बबनराव आंधळे सन्मानित

बीड (प्रतिनिधी) : मातृभूमी प्रतिष्ठान बीड यांच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना राज्यस्तरीय रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी राज्यस्तरीय समाज रत्न पुरस्कार २०२६ हा पुरस्कार सामाजिक कार्यामध्ये सतत २५ वर्षापासून स्वतःला झोकून देऊन काम करणारे राजकीय, सामाजिक शैक्षणिक, सहकार क्षेत्रात सक्रिय सहभाग असणारे बीड जिल्हा सहकार बोर्डाचे संचालक तथा संत तुकाराम प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक व ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अरुणा असफअली शिक्षण संस्था कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन, सावता नागरी सहकारी पतसंस्थेचे संचालक प्राध्यापक बबनराव आंधळे सर यांना लोकनेत्या शिक्षण महर्षी प्रा. सुशीलाताई मोराळे यांच्या हस्ते समाज रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी हरिभक्त परायण मोहन महाराज खरमाटे,राज्य ऊसतोड कामगार नेते गहिनीनाथ थोरे ,इंजिनिअर उत्तमराव मिसाळ ,मोहनराव शिरसाट, प्रा. आर. टी. गर्जे, डॉ.संजय तांदळे ,प्राचार्य बाळासाहेब नागरगोजे, यांच्यासह असंख्य मान्यवरांच्या उपस्थितीत दि. १ मार्च २०२६ रविवार रोजी श्री संत भगवान बाबा सामाजिक प्रतिष्ठान बीड येथे वंजारी समाज वधू वर सूचक मेळाव्यात पुरस्कार वितरण करण्यात आले. त्यांच्या वाढदिवसानिमित्त बाणेगाव ग्रामपंचायत मध्ये मुलीच्या जन्माचे स्वागत, तिच्या नावावर १०,०००/– दहा हजार रुपयाची F.D. fix deposit करण्याचा निर्णय प्रा. बबनराव आंधळे यांनी घेतलेला आहे.

# ३६० खाटांच्या रुग्णालयासाठी ३०४ कोटींची घोषणा ; पण २१ कोटींची माता-बालसंगोपन इमारत धुळखात पडून-डॉ.ढवळे

**बीड दि ८ (प्रतिनिधी): राज्याचा अर्थसंकल्प सादर करताना देवेंद्र फडणवीस यांनी बीड जिल्हा रुग्णालयाच्या ३६० खाटांच्या विस्तारीकरणासाठी ३०४ कोटी रुपयांचा निधी जाहीर केला. मात्र प्रत्यक्षात बीड जिल्हा रुग्णालयाच्या आवारात सुमारे २१ कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेली माता व बालसंगोपन इमारत गेल्या साडे तीन वर्षांपासून फर्निचर, अग्निरोधक यंत्रणा, लिफ्ट आदींसाठी आवश्यक निधी न मिळाल्याने धुळखात पडून असून अद्याप कार्यान्वित करण्यात आलेली नाही, अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी दिली.**

या इमारतीसाठी केवळ १० कोटी रुपयांच्या निधीअभावी काम रखडलेले असतानाही शासनस्तरावर कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. डॉ. ढवळे यांनी सहकाऱ्यांसमवेत गेल्या तीन वर्षांपासून शासन दरबारी निवेदने देत तसेच विविध आंदोलनांद्वारे तत्कालीन पालकमंत्री, जिल्हाधिकारी आणि जिल्हा शल्यचिकित्सक यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला आहे. दरम्यान, तत्कालीन जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांनी इमारतीची पाहणी करून जिल्हा नियोजनमधून ३ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली होती. त्या निधीतून काही कामे पूर्ण झाली; मात्र इमारत पूर्णपणे कार्यान्वित करण्यासाठी अजूनही सुमारे ७ कोटी रुपयांच्या निधीची गरज आहे. वारंवार पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून अद्याप निधी मंजूर करण्यात आलेला नाही, असे डॉ. ढवळे यांनी सांगितले.

यामुळे ३६० खाटांच्या रुग्णालयासाठी जाहीर करण्यात आलेल्या ३०४ कोटी रुपयांच्या निधीच्या घोषणेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून ही केवळ बोलून मोकळं होण्याची घोषणा असून बोलाचीच कढी आणि बोलाचाच भात असल्याची प्रतिक्रिया डॉ. ढवळे यांनी व्यक्त केली. बीड जिल्हा रुग्णालयाची सध्याची इमारत अपुरी पडत असून त्याच ठिकाणी सोनोग्राफी व एक्स-रे विभाग कार्यरत आहेत. दररोज सुमारे ४०० हून अधिक रुग्ण तपासणीसाठी येतात; मात्र व्हरांड्यात केवळ १५ ते २० रुग्णांसाठीच बसण्याची व्यवस्था असल्याने गर्भवती महिलांना ताटकळत उभे राहावे लागते. आयपीडी पान २ वर




## रेशन गहू काळ्या बाजारात विक्री प्रकरण

# गुन्हा व न्यायालयीन कार्यवाही बॉम्बे हायकोर्ट औरंगाबाद खंडपीठाकडून रद्द

माजलगाव (प्रतिनिधी):-माजलगाव शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आलेल्या रेशन गहू काळ्या बाजारात विक्री प्रकरणात बॉम्बे हायकोर्ट औरंगाबाद खंडपीठ यांनी महत्त्वाचा निर्णय देत संबंधित गुन्हा व न्यायालयीन कार्यवाही रद्द केली आहे.या प्रकरणात २०२२ मध्ये माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा क्र. ३४ नोंदविण्यात आला होता. तपासादरम्यान ट्रकमधून गहू जप्त करण्यात आला होता आणि तो सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला होता. त्यानंतर या प्रकरणात Essential Commodities-ct १९५५ च्या कलम ३ व ७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.मात्र न्यायालयात झालेल्या सुनावणीदरम्यान जप्त करण्यात आलेला गहू सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील असल्याचा ठोस पुरावा तपास यंत्रणेला सादर करता आला नसल्याचे निदर्शनास आले. तसेच गहू खुले बाजारातून खरेदी करण्यात आल्याचेही नमूद करण्यात आले.दोन्ही बाजूंचा युक्तिवाद व कागदपत्रांचा अभ्यास करून न्यायालयाने या प्रकरणात आवश्यक पुरावे नसल्याचे निरीक्षण नोंदवले. त्यामुळे माजलगाव येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयात प्रलंबित असलेले आर.सी.सी. क्र. ८७/२०२२ मधील पुढील कार्यवाही रद्द करण्याचे आदेश न्यायालयाने दिले.या प्रकरणात अर्जदारांच्या वतीने ॲड. शरद एस. सोलंके यांनी काम पाहिले. तसेच या निर्णयामुळे प्रकरणातील हनुमान वराडे आणि सतीश वाघमारे यांना दिलासा मिळाला आहे.



# गेवराई चाळीस फुटाचा रस्ता झाला वीस फूट

## ताकडगाव रस्त्यावरील अतिक्रमण कधी काढणार ?

गेवराई दि.८(प्रतिनिधी):- गेवराई शहरातील ताकडगाव रस्त्यावर अतिक्रमण धारकांनी जागा धरून आपापले व्यवसाय रस्त्यावर थाटले आहेत. तर काही प्लॉट धारकांनी अतिक्रमण करून गाळे किरायाणे दिले आहेत. चाळीस फूट असलेला रस्ता वीस फूट झाला आहे त्यामुळे नेहमीच रस्त्यावर वाहनांची कोंडी होऊन अनेकदा अपघात घडले आहेत. दरम्यान नगर परिषदेचे मुख्यधिकारी विक्रम मांडूरके यांनी अनेकदा या अतिक्रमण धारकांना नोटीसा देऊन देऊन कागदोपत्री आपले काम पूर्ण केले आहे पण याचे पुढे काहीच झाले नाही.

ताकडगाव रस्ता हा नविन गेवराई चा मुख्य रस्ता आहे.या भागात शाळा, क्लासेस मोठ्या प्रमाणावर आहेत. हजारो विद्यार्थी व नागरिकांची या रस्त्यावरून वर्दळ असती. हा रस्ता कागदोपत्री ४० फुटाचा आहे. मात्र हा रस्ता २० फुटाचा ही पान २ वर

# अवैध वाळू वाहतूक करणारा टेम्पो पोलिसांच्या ताब्यात

## डीवायएसपी पूजा पवार पथकाची कारवाई



बीड : बीड जिल्ह्यातील काही वाळू उपसा करण्यासाठी परवानगी दिली असली तरी काही ठिकाणी मात्र चोरट्या पद्धतीने वाळू उत्खनन व वाहतूक होत असल्याचे चित्र बीड जिल्ह्यात दिसत आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा पवार यांच्या पथकाने एक आयशर टेम्पो जप्त केला आहे. ही पान २ वर

## गांधी महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी अमोल खिलारे याची पीएसआय पदी निवड



कडा- येथील श्री. अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाच्या गांधी महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी अमोल महादेव खिलारे याने महाराष्ट्र शासनाच्या २०२४ मध्ये झालेल्या एम.पी.एस. सी. अंतर्गत पीएसआय पदी निवड झाली. मोठी स्वप्ने, कठीण संघर्ष परंतु अढळ जिद्दीच्या सहाय्याने अमोलने आव्हानांवर मात करत हे यश संपादन केले आहे. आष्टी तालुक्यातील पाटण सांगवी सारख्या ग्रामीण भागात अतिशय सामान्य परिस्थितीमध्ये राहून त्याने कठीण परिश्रमाच्या जोरावर मिळवलेले यश हे आजच्या सोशल मीडियाच्या आहारी गेलेल्या तरुणांना प्रेरणादायी ठरणारे आहे. अमोलने हे यश कोणत्याही खाजगी शिकवणीशिवाय स्वतः ग्रंथालयात तासनतास अभ्यास करून मिळवले आहे. गांधी महाविद्यालयाच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचा फायदा झाल्याचे त्याने यावेळी सांगितले. त्याच्या या यशाबद्दल श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाच्या सर्व पान २ वर

## माँ नर्मदा परिक्रमा ३६०० कि.मी.पूर्तीनिमित्त

# १३ मार्चला डोंगरकिन्ही येथे मिरवणूक व दर्शन सोहळा

पाटोदा (प्रतिनिधी) - ता. पाटोदा येथील डोंगरकिन्ही गावात माँ नर्मदा पायी परिक्रमा ३६०० कि.मी. पूर्ती निमित्त शुक्रवार, दिनांक १३ मार्च २०२६ रोजी भव्य दिव्य मिरवणूक व दर्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. धार्मिक उत्साहात पार पडणाऱ्या या सोहळ्यास भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ८ वाजता होणार असून सकाळी ८ ते ११ या वेळेत भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीत पुणे येथील सुप्रसिद्ध ढोल पथक, बॅण्ड पथक, लेझीम पथक, हत्ती-घोड्यांची मिरवणूक, तसेच लातूर येथील प्रसिद्ध रांगोळी कलाकारांचे आकर्षक रांगोळी सादरीकरण पाहायला मिळणार आहे. तसेच आळंदी येथील भजनी मंडळाच्या भजन-कीर्तनाने वातावरण भक्तिमय होणार आहे.मिरवणुकी नंतर सकाळी ११ ते ११.३० या वेळेत साधुसंतांचे स्वागत करण्यात येणार असून त्यानंतर ११.३० ते १ या वेळेत साधु महात्म्यांचे मार्गदर्शन होणार आहे. कार्यक्रमाच्या शेवटी दुपारी १ वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.संपूर्ण कार्यक्रमासाठी आकर्षक सजावट, अतिशबाजी तसेच विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. नर्मदा परिक्रमा ही अत्यंत पवित्र आणि कठीण यात्रा मानली जाते. नर्मदा नदीच्या किनाऱ्याने सुमारे ३६०० किलोमीटरची पदयात्रा करत भक्त पान २ वर





माजलगाव-तालुक्यातील पात्रुड येथील श्री.ह.भ.प.भगवान बाबा गायकवाड यांनी नुकतीच नर्मदा परिक्रमा यात्रा पूर्ण केल्याने त्यांचा सत्कार करताना जयसिंग सोळंके,एकनाथ मस्के,अर्जुन नाईकनवरे,शंतनू सोळंके, रोहन घाडगे,घनश्याम भुतडा,माऊली नाटकर,चंद्रकांत गोमचाळे दिसत आहेत

# जागतिक महिला दिनानिमित्त योगेश्वरी मोटार ड्रायव्हिंग स्कूलमध्ये स्त्रीशक्तीचा सन्मान

माजलगाव दि.८(प्रतिनिधी):- योगेश्वरी मोटार ड्राइविंग स्कूल मध्ये जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला स्त्रीशक्तीचा सन्मान,त्यांच्या यशाचा गौरव आणि समानतेचा संदेश देत महिलांना एक दिवसीय मोफत वाहन प्रशिक्षण, काव्यवाचन, जनजागृती मोहीम आणि सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावर्षी महिलांना समान संधी शिक्षण आणि पाठबळ देण्यावर (ऋ्लींश ीं ऋ्शळप) भर देण्यात आला आहे.यावेळी डॉक्टर प्रज्ञा जोशी यांनी कविता सादर करून महिला दिनाचा खरा अर्थ त्यांना समान हक्क,सन्मान आणि त्यांना नवीन संधी देऊन अधिक सक्षम बनवणे हा आहे अशी भावना व्यक्त केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा प्रतिभा जाधव यांनी केले तर आभार प्रदर्शन कु उत्कर्षा क्षिरसागर हिने केले. यावेळी योगेश्वरी मोटार ड्राइविंग स्कूलचे प्रोप्रा दत्तात्रय क्षीरसागर व विश्वनाथ शिंदे यांच्यासह प्रा प्रतिभा जाधव,डॉ प्रज्ञा जोशी, सीमा जाधव, वैशाली सोळंके, प्रिया गायके, द्वारका सिरसट, प्रतिभा लोकरे, छाया अबुज, शिल्पा पांचाळ, गीता गायके व उत्कर्षा शिरसागर यांच्यासह विविध क्षेत्रातील महिला




# पाणीपुरवठ्याची कामे पावसाळ्यापूर्वी गुणवत्तापूर्ण व वेळेतच पूर्ण करा-आ.सुरेश धस

## नगरपंचायतीच्या अधिकारी-पदाधिकाऱ्यांची बैठक; ठेकेदारांना स्पष्ट सूचना

पाटोदा(महेश बेदरे) :- आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघातील नागरिकांना स्वच्छ व नियमित पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी नगरविकास विभागाच्या नगरोत्थान योजनेअंतर्गत सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनांचा आढावा आ.सुरेश धस यांनी रविवारी घेतला. यावेळी प्रामुख्याने पाटोदा नगरपंचायतीसह आणि शिरूर कासार व आष्टी या तीनही नगरपंचायतींमध्ये सुरू असलेल्या पाणीपुरवठा व नळजोडणीच्या कामांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीदरम्यान विशेषतः पाटोदा नगरपंचायत हद्दीत सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनेच्या कामांची प्रगती, नळजोडणीचे वितरण, पाण्याच्या टाक्यांचे बांधकाम, पाणी शुद्धीकरण (फिल्टर) युनिट, पाइपलाइन टाकण्याची कामे तसेच उपलब्ध पाणीसाठा याबाबत आ.धस यांनी तपशीलवार माहिती घेतली. शहरातील नागरिकांना स्वच्छ व फिल्टर झालेले पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, हा नगरोत्थान योजनेचा उद्देश असून त्या अनुषंगाने सुरू असलेली सर्व कामे पावसाळ्यापूर्वीच गुणवत्तापूर्ण व वेळेत पूर्ण झाली पाहिजेत, असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले.



पाटोदा शहरासह वाडी-वस्त्यांपर्यंत पाणीपुरवठा सुरळीत व्हावा, यासाठी पाइपलाइन व नळजोडणीची कामे गतीने पूर्ण करण्याबाबतही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. कामांच्या गुणवत्तेत कोणतीही तडजोड होऊ नये तसेच नागरिकांना पाणीपुरवठ्याबाबत अडचण निर्माण होऊ नये, पान २ वर

# चंपावती विद्यालयातील चित्रकला स्पर्धेत विद्यार्थ्यांचे यश

बीड (प्रतिनिधी) शहरातील चंपावती विद्यालयात चंपावती महोत्सवानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवातील चित्रकला स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.या स्पर्धेत विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेचे आणि कलागुणांचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. स्पर्धेत विद्यार्थी यशराज चव्हाण यांनी अत्यंत सुंदर व आकर्षक चित्र सादर करून प्रथम क्रमांक पटकावला. त्यांच्या चित्रातील कल्पकता, रंगसंगती आणि सादरीकरण पाहून परीक्षकांनी त्यांना प्रथम क्रमांकासाठी निवडले. तसेच परिक्षक पसंती क्रमांक तनुश्री मुळक ,अपूर्वा पवार, दिप्ती राऊत, अनघा आदे यांनी मिळवला.



बीड-येथील शेख आयशा अफसर या आठ वर्षीय चिमुकली ने आयुष्यातील पहिला रोजा पूर्ण केला. याबद्दल तिचे अभिनंदन होत आहे.

# सिरसमार्गच्या सुपुत्राने वैद्यकीय क्षेत्रात घेतली उत्तुंग भरारी

गेवराई दि.८ (प्रतिनिधी) - गेवराई तालुक्यातील शिरसमार्ग येथील सामान्य कुटुंबातील सुपुत्र डॉ.सुहास शारदा सुदामराव शेजाळ यांनी जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या बळावर वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करत हृदयरोगतज्ज्ञ (Cardiologist) म्हणून उत्तुंग अशी भरारी घेतली असल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे

डॉ.सुहास शेजाळ यांचे प्राथमिक शिक्षण जयभवानी विद्यालय गढी याठिकाणी झाले. त्यानंतर त्यांनी जवाहर नवोदय विद्यालय येथे बारावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. शिक्षणात सातत्याने प्रगती करत त्यांनी सन २०१३ मध्ये NEET परीक्षेत यश मिळवून वैद्यकीय शिक्षणाच्या क्षेत्रात प्रवेश केला. यानंतर त्यांनी मुंबई येथील जी.एस.मेडिकल कॉलेज (KEM² Hospital) या देशातील नामांकित वैद्यकीय महाविद्यालयातून चइइडपदवी संपादन केली. पुढे मुंबई येथील जे.जे.हॉस्पिटल येथे (MD Medicine) पदवी पूर्ण करून वैद्यकीय क्षेत्रात आपली वाटचाल अधिक भक्कम केली आहे. हृदयरोग या विषयातील उच्च शिक्षणासाठी त्यांनी पुणे येथील रूबी हॉल क्लिनिक येथे DrNB (Cardiology) हि पदवी यशस्वीरित्या प्राप्त केली. याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.



# एका महिन्यात विवाहितेचे लावले तीन लग्न ; पुण्यातल्या रॅकेटचा पर्दाफाश

अंबाजोगाई दि ८(प्रतिनिधी) - संसाराची स्वप्ने पाहणाऱ्या एका २१ वर्षीय विवाहितेच्या आयुष्याचा खेळ करणाऱ्या एका मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश झाला आहे. पुण्यातून चालणाऱ्या या रॅकेटने केवळ एका महिन्यात या तरुणीचे तीन वेगवेगळ्या पुरुषांशी पैशांसाठी बळजबरीने लग्न लावून दिल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या सततच्या छळाला आणि मानसिक त्रासाला कंटाळून पीडितेने विष प्राशन करून आपले आयुष्य संपवण्याचा प्रयत्न केला सध्या तिच्यावर मिरजगाव येथील रुग्णालयात उपचार सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे. लातूर येथील रहिवासी असलेल्या २१ वर्षीय महिलेचे पहिले लग्न दोन वर्षांपूर्वी बीडमध्ये झाले होते. मात्र पतीच्या अनैतिक संबंधांमुळे ती माहेरी राहण्यास आली. आजी-आजोबांच्या निधनानंतर निराधार झालेल्या पीडितेचा फायदा शेजारी राहणाऱ्या एका महिलेने घेतला. पुण्यातील महानंदा नावाच्या एजंटकडे नेऊन तुझे दुसरे लग्न लावून देते, असे आमिष तिला दाखवण्यात आले.पीडितेने दिलेल्या जबाबा नुसार या रॅकेटने तिला वस्तू समजून चक्क लिलाव मांडला. एजंट महानंदाने कात्रजच्या एका व्यक्तीकडून ५ लाख रुपये घेऊन पीडितेचे पहिले बळजबरी लग्न लावले. तिथे ती १० दिवस राहिली.त्यानंतर तिला कुरुक्षेत्र येथील एका माणसाकडे ४.३० लाख रुपयांत विकले गेले, जिथे तिला केवळ ५ दिवस ठेवण्यात पान २ वर

